सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २७ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ११५ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेनची ट्रायल यशस्वी, आता रेल्वे 'क्रांतीच्या' मार्गावर!

नवी दिल्ली : देशात प्रथमच हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेनची यशस्वी ट्रायल पार पडली आणि भारतीय रेल्वेने अक्षरशः इतिहास रचला. रेल्वे सेवेत आता क्रांतीकारक बदल होण्याची शक्यता आहे. चेन्नई येथील इंटीग्रल कोच फॅक्ट्रीत देशातील हायड्रोजनवर चालणाऱ्या पहिल्या ट्रेनची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशवासियांसाठी ही मोठी बातमी दिली आहे. या यशस्वी चाचणीमुळे हायड्रोजनवर रेल्वे धावण्याचा मार्ग आता मोकळा झालाय, असं रेल्वे मंत्र्यांनी म्हटलंय.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विटरवर (द) पोस्ट करून ही माहिती दिली आहे. त्यांनी या पोस्टमध्ये या ट्रेनमधील कोच टेस्टचा व्हिडीओ शेअर केला आहे. हायड्रोजनवर चालणाऱ्या पहिल्या कोच (ड्रायव्हिंग पॉवर कार)च्या खउऋची चेन्नईत यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. भारत १२०० एचपी हायड्रोजन ट्रेन विकसित करत आहे, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

या कोचला ड्रायव्हिंग पॉवर कारच्या नावाने ओळखले जाते. हरित ऊर्जा आणि भविष्यातील परिवहन सेवेसाठीचे नवीन पर्याय निर्माण करण्यासाठी भारत नेहमीच वचनबद्ध राहिला आहे, असं वैष्णव यांनी म्हटलंय.

यात वेगळं काय?

डीझेल आणि विजेवर चालणाऱ्या ट्रेनची तुलना केल्यास हायड्रोजनवर चालणारी ट्रेनही पर्यावरण पूरक आहे. या ट्रेनमधून धूर येत नाही आणि कार्बन डायऑक्साईडही सोडला जात नाही. त्यामुळे प्रदूषणाला आळा बसतो. ही ट्रेन हायड्रोजन फ्यूल सेल तंत्रज्ञानावर काम करते. यात हायड्रोजन गॅस आणि ऑक्सिजनच्या प्रक्रियेतून एनर्जी निर्माण होते.

## १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार जाहीर
### महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश

नवी दिल्ली : लोकसभेत चांगली कामगिरी करणाऱ्या विविध पक्षांच्या १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार जाहीर झाले आहेत. तसेच संसदेत सातत्याने उत्तम कामगिरी करणाऱ्या चार जणांना विशेष ज्युरी पुरस्कार जाहीर झाले आहेत. भर्तृहरी महताब (भाजप, ओडिशा), एनके प्रेमचंद्रन (क्रांतिकारी समाजवादी पक्ष, केरळ), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, महाराष्ट्र) आणि श्रीरंग अप्पा बारणे (शिवसेना, महाराष्ट्र) यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या सर्वांनी १६ व्या लोकसभेपासून सर्वोत्तम कामगिरी कायम ठेवली आहे.




संसदेत उत्तम कामगिरी करणाऱ्या रवी किशन (भाजप), निशिकांत दुबे (भाजप), स्मिता उदय वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप), प्रवीण पटेल (भाजप), विद्युत बरन महतो (भाजप) आणि दिलीप सैकिया (भाजप), अरविंद सावंत (शिउबाठा), , नरेश म्हस्के (शिवसेना), वर्षा गायकवाड (काँग्रेस) यांना संसदरत्न पुरस्कार देण्यात येणार आहेत.

समिती श्रेणीमध्ये, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालील वित्त स्थायी समिती आणि डॉ. चरणजित सिंग चन्नी (काँग्रेस) यांच्या अध्यक्षतेखालील कृषी स्थायी समितीला त्यांच्या अहवालांच्या गुणवत्तेसाठी आणि कायदेविषयक देखरेखीतील योगदानासाठी सन्मानित केले जाईल. संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलै २०२५ पासून सुरू आहे. पण विरोधकांच्या गदारोळामुळे पहिल्या आठवड्याचा बराच वेळ वाया गेला आहे. आता पुढच्या आठवड्यात संसदेत ऑपरेशन सिंदूरवर दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा नियोजीत आहे. या चर्चेवेळी काय घडते याकडे अनेकांचे लक्ष आहे.

## झारखंडमध्ये तीन नक्षलवादी ठार, शस्त्रसाठा जप्त

गुमला : झारखंडमधील गुमला जिल्ह्यात घाघरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लावादाग जंगलात पोलीस आणि सुरक्षा पथकाने संयुक्त कारवाई केली. या कारवाईत बंदी घातलेल्या झारखंड जन मुक्ती मोर्चा संघटनेचे तीन नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा पथकाने घटनास्थळावरुन एक एके ४७ रायफल आणि दोन इन्सास रायफल यांच्यासह इतर शस्त्रसाठा जप्त केला. गुमला एसपी हारिश बिन जमां यांनी ही माहिती दिली.

खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीआधारे जंगलात पोलीस आणि सुरक्षा पथकाने संयुक्तपणे शोधमोहीम राबवली. शोधमोहीम सुरू असल्याचे लक्षात येताच नक्षलवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. या गोळीबाराला तातडीने प्रत्युत्तर देण्यात आले. चकमक सुरू झाली. अखेर चकमकीत झारखंड जन मुक्ती मोर्चा संघटनेचे तीन नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळावरुन सुरक्षा पथकाने शस्त्रसाठा जप्त केला.

याआधी १५ जुलै रोजी बोकारो जिल्ह्यातील गोमिया पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिरहोर्डेरा जंगलात सीपीआय माओवादी नक्षलवादी आणि सुरक्षा पथक यांच्यात चकमक झाली होती. या चकमकीत सुरक्षा दलांनी नक्षलवादी कुंवर मांझीसह दोन नक्षलवाद्यांना ठार मारले होते. कुंवर मांझीवर ५ लाख रुपयांचे बक्षीस होते. बिरहोर्डेरा जंगलातील चकमकीत कोब्रा २०९ बटालियनचा एक जवान हुतात्मा झाला.

झारखंड पोलिसांनी या वर्षी राज्य नक्षलमुक्त करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. झारखंडमध्ये २०२५ च्या सुरुवातीपासून पोलिसांनी २२ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. या काळात नक्षलवाद्यांकडून ११५ शस्त्रे, ८५९१ गोळ्या, १७६.५ किलो स्फोटके आणि ४,५१,०४७ रुपये जप्त करण्यात आले आहेत. तसेच, १७९ आयईडी शोधून निष्क्रिय करण्यात आले. नक्षलवाद्यांविरुद्ध पोलिसांची ही एक मोठी कारवाई आहे.

## सर्वसामान्यांच्या खिशावर कात्री! १ ऑगस्टपासून 'हे' नियम बदलणार

मुंबई : सर्वसामान्यांसाठी अतिशय महत्वाची बातमी आहे. १ ऑगस्ट २०२५ पासून अनेक नियम बदलणार आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर फटका बसण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारकडून तसेच बँका, वाहन क्षेत्र आणि वित्तीय संस्थांकडून काही नवे नियम लागू होणार असून, यामुळे तुमच्या खिशावरचा भार आणखी वाढणार आहे. पेट्रोल, एलपीजीच्या किमतींमध्ये बदल होऊ शकतो. तसेच णझख पेमेंटबद्दलही मोठे बदल होण्याची शक्यता आहे. जाणून घेऊया या सर्व बदलांची माहिती..

क्रेडिट कार्ड

SBIच्या क्रेडिट कार्डधाकरकांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. ११ ऑगस्टपासून एसबीआय अनेक को-ब्रँडेड क्रेडिट कार्डवर मोफत हवाई अपघात विमा बंद करणार आहे. पीएसबी, युको बँक, सेंट्रल बँक, करूर वैश्य बँक, अलाहाबाद बँक आणि डइख काही एलिट आणि प्राइम कार्डवर १ कोटी किंवा ५० लाखांचे कव्हर देत असे, पण आता मात्र ते मिळणार नाही.

LPG गॅस दरात बदल

प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला एलपीजी किंवा व्यावसायिक सिलेंडरच्या किमती बदलतात. त्यामुळे आताही त्यात बदल होण्याची शक्यता आहे. १ जुलै रोजी व्यावसायिक सिलेंडर ६० रुपयांनी स्वस्त झाला होता. त्यामुळे आता १ तारखेला ही किंमत बदलणार की तशीच राहणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. आधीच महागाईने त्रस्त असलेल्या घरगुती ग्राहकांना आणखी तडाखा बसण्याची शक्यता.

UPI चे नियम बदलणार

१ ऑगस्टपासून UPIचे नियम बदलत आहेत. पेटीएम, फोनपे, जीपे किंवा इतर प्लॅटफॉर्मचा वापऱ्यांसाठी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने काही नवीन नियम आणले आहेत. यानुसार तुम्ही तुमच्या यूपीआय पवरून दिवसातून फक्त ५० वेळा बॅलन्स चेक करू शकणार आहेत. तसेच ऑटोपे व्यवहार आता फक्त सकाळी १० वाजण्यापूर्वी, दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत आणि रात्री ९:३० नंतर करता येणार आहे. यासह इतरही काही बदल होणार असल्याची माहिती आहे.

सीएनजी-पीएनजीच्या किमतीत बदल

सीएनजी-पीएनजीच्या किमतीतही १ तारखेला बदल होत असतो, मात्र एप्रिलपासून या किंमती स्थिर आहेत. मात्र आता त्यात बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या किमती वाढल्यास सर्वसामान्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

एटीएफच्या किमती

एअर टर्बाइन फ्युएल (विमानाचे इंधन) च्या किमतीत १ ऑगस्टपासून बदल होऊ शकतो. याच्या किमती वाढल्या तर विमानाच्या तिकीटाच्या किमती वाढू शकतात. तसेच इंधनाची किंमत कमी झाली तर विमान प्रवास स्वस्त होण्याची शक्यता आहे.

## अनेक राज्यांमध्ये अलर्ट जारी

नवी दिल्ली : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढला आहे. हवामान खात्याने बिहार, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश आणि केरलसह अनेक राज्यांमध्ये पावसाचा अलर्ट जारी केला आहे.

शुक्रवारी मध्य प्रदेशात जोरदार पावसाची नोंद झाली असून सिंगरौली येथे तब्बल ७ इंच पावसाची नोंद झाली आहे. अशोकनगरच्या चंदेरी येथील राजघाट धरणाचे १२ दरवाजे उघडण्यात आल्याने पुलावरील पाण्याची पातळी ८ फूटांवर गेली आहे. त्यामुळे मध्य प्रदेश-उत्तर प्रदेश जोडणारा मुख्य महामार्ग बंद झाला असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. हिमाचलमध्ये वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रीय होणार असून, मंडी, शिमला आणि सिरमौरमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसाचा कहर सुरूच आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एसडीएमए) नुसार, शुक्रवारी संध्याकाळपर्यंत २२१ रस्ते, ३६ वीज ट्रान्सफॉर्मर आणि १५२ पाणीपुरवठा योजना बंद ठेवण्यात आल्या आहेत.

## सेवा भारती - देवगिरी प्रांतात स्वावलंबन व सेवा नोंदणी उपक्रम

छत्रपती संभाजीनगर २६ जुलै : सेवा भारती - देवगिरी प्रांताच्या वतीने आज समाजोन्नतीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत स्वावलंबन व सेवा नोंदणी उपक्रमाचा भव्य प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमामार्फत समाजातील कुशल व्यक्तींना, सेवाप्रदात्यांना आणि नवउद्योजकांना रोजगार व व्यवसायाच्या सुवर्णसंधी देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. सविता दिवाकर कुलकर्णी (विभाग प्रमुख - महिला सक्षमीकरण, राष्ट्रीय सेवा भारती । अखिल भारतीय न्यासी) यांच्या प्रेरणादायी हस्ते पार पडले.

मुख्य अतिथी म्हणून सौ. आशा जाधव (प्रसिद्ध महिला उद्योजिका) आणी श्री. अनिलजी भालेराव (देवगिरी प्रांत संघचालक) डॉ. सूर्यकांत शिरपेवार (सेवा भारती - देवगिरी प्रांत अध्यक्ष) यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.



उपक्रमाचा उद्देश: समाजातील चालक, शिंपी, इस्त्री कामगार, गृहिणी, छोट्या उद्योजक, इलेक्ट्रिशियन, शिक्षक, डेकोरेटर आदींना एकत्र करून त्यांची सुसज्ज नोंदणी करून त्यांना कामाचे थेट संधी, संपर्क, आणि स्वाभिमानाने जगण्याचा आधार मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

नोंदणीसाठी खुल्या सेवा श्रेणी: ड्रायव्हर,प्रेस सेवा,शिंपी / टेलर,भाजी विक्रेते,सलून / केस कापणारे, गॅरेज सेवा,घरगुती मेस / स्वयंपाक,ब्युटी पार्लर / मेहंदी,घरकाम करणाऱ्या महिला, घरपोच डिलिव्हरी सेवा, साफसफाई कामगार,इव्हेंट डेकोरेशन / साउंड / लाइटिंग, इलेक्ट्रिशियन / प्लंबर / कारपेंटर,शिक्षक / ट्युशन,कंप्युटर / डिजिटल सेवा,व इतर लघुउद्योग/कौशल्यधारी सेवा. या उपक्रमाच्या माध्यमातून सेवादात्यांची संघटित माहिती, विश्वासार्हता, आणि व्यावसायिक ओळख निर्माण केली जाणार असून, समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक मजबुतीसाठी ही एक भक्कम पायरी ठरणार आहे.

## गुगल मॅपने रस्ता दाखवला अन् गाडी थेट खाडीत!

बेलापूर : 'डावीकडून उजवीकडे वळा', 'पुढे सरळ जा' हे सांगणारा गुगल मॅप यावेळी प्राणघातक ठरला! बेलापूरमध्ये एका वाहनचालकाने गुगल मॅपवर दाखवलेला रस्ता घेतला आणि थेट गाडी पुलाखालच्या उघड्या खाडीत घातली. या विचित्र आणि धक्कादायक प्रकारामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गुगल मॅपच्या आधारे उलवेला जाणारी भरधाव कार थेट खाडीत कोसळल्याची घटना मध्यरात्रीच्या सुमारास बेलापूरमध्ये घडली. घटनेवेळी तिथे उपस्थित असलेल्या सागरी सुरक्षा पोलिसांनी वेळीच महिलेचे प्राण वाचवले. शिवाय क्रेनच्या साहाय्याने खाडीत पडलेली कार देखील बाहेर काढण्यात आली.

बेलापूर येथील खाडीपुलावर जाण्याच्या ऐवजी त्यांनी पुलाखालील मार्ग घेतला. यामुळे गुगल मॅपवर दिसत असल्याप्रमाणे तिथे सरळ रस्ता असल्याचे त्या महिलेला वाटले. यामुळे सरळ जात असताना महिलेची कार थेट ध्रुवतारा जेट्टीवर जाऊन खाडीत कोसळली.






www.tarunbharat.net
रविवार, दि. २७ जुलै २०२५
तरुण भारत छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

• दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासनाची सुरुवात झाली आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या या राष्ट्रनायकावर डिप्लोमा ।अणि पोस्ट ग्रॅज्युएशन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. तत्पूर्वी, २७ फेब्रुवारी २०२५ रोजी या विद्यापीठात कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्राची स्थापना केली आहे. आज जवळपास १० कोटी मराठी भाषिक आहेत, हे विशेष!

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**

# स्वर्गीय नर्तक



**स्वर्गीय नर्तकचा वीणीचा हंगाम पावसाळ्यात असतो. 'पॅराडाईज फ्लायकॅचर' असे इंग्रजी नाव असलेल्या स्वर्गीय नर्तक स्वभावाने लाजरा असून, हा पक्षी विशेष शीळ घालून नर मादीला रिझवतो.**

मध्यप्रदेशातील बांधवगड राष्ट्रीय उद्यानात मोठ्या संख्येने आढळून येणारे स्वर्गीय नर्तक नामक पक्षी तसे भारतातील इतर जंगलातही भ्रमंती करतात. मात्र, मध्यप्रदेशात यांची संख्या मोठी असल्याने त्यांना मध्यप्रदेशाचा राज्यपक्षी म्हणून ओळख निर्माण झाली आहे. स्वर्गीय नर्तक या पक्ष्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची लांब शेपटी! यामुळे त्यांच्या सौंदर्यात अधिक भर पडते. तो अतिशय सुरेख दिसतो. पूर्ण वाढ झालेला नर पांढऱ्या रंगाचा असून मादी लाल रंगाची दिसते. विविध प्रकारचे किडे खाणे हा या पक्ष्यांचा छंदच आहे. किडे त्यांना खूप आवडतात. स्वर्गीय नर्तक या पक्ष्यांना हिंदीत दूधराज असेही म्हणतात. बुलबुल या पक्ष्याच्या आकाराचा असणारा स्वर्गीय नर्तक शुभ्र पांढऱ्या रंगाचा असून डोके काळ्या रंगाचे असते. तरुण नराचा रंग मात्र तांबूस असतो. मादीचे डोके काळे असते. स्वर्गीय नर्तकच्या डोक्यावर लहानसा तुरा असतो. मादी बुलबुलसारखी असून बुलबुलच्या सर्व सवयीसुद्धा या पक्ष्यात आहेत. साधारणतः २० सें.मी. एवढा मोठा असणाऱ्या नराची शेपटी त्याच्या शरीराच्या दुप्पट लांब असते. डोके आणि लांबलचक तुरा हे जर्द काळ्याशार चमकदार रंगाचे असते. या पक्ष्यांच्या डोळ्याभोवती आकर्षक निळ्या रंगाची कडे असते. जंगलात अर्धा रंग पांढरा आणि अर्धा रंग तांबूस विटकरी असे नर पक्षीही बघायला मिळतात. संपूर्ण भारतात आढळून येणाऱ्या या पक्ष्यांच्या दोन उपजाती भारतात तर एक उपजात श्रीलंकेत आढळते. भारताच्या नैऋत्येकडील प्रदेशाचे स्थानिक पक्षी असलेले स्वर्गीय नर्तक स्थलांतरितही आहेत. कारण, दरवर्षी जून महिन्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात या पक्ष्यांची असंख्य घरटी दिसून येतात. याच कालावधीत ते पन्हाळा परिसरात स्थलांतर करून येत असल्याचे एका अभ्यासात दिसून आले. सांगली जिल्ह्यातही यांचा वावर आहे. शेती परिसरात या पक्ष्यांची घरटी आणि पिले आढळतात.

स्वर्गीय नर्तकचा वीणीचा हंगाम पावसाळ्यात असतो. 'पॅराडाईज फ्लायकॅचर' असे इंग्रजी नाव असलेल्या स्वर्गीय नर्तक स्वभावाने लाजरा असून, हा पक्षी विशेष शीळ घालून नर मादीला रिझवतो. नर-मादी दोघे मिळून जमिनीपासून साधारण सहा ते आठ फुटांवर आपली घरटी बांधतात. त्यांच्या काड्याकाटक्यांच्या आकर्षक घरट्यात मुलायमपणा येण्यासाठी कोळ्याच्या जाळ्याचे तंतू धागे वापरतात.

---

**दोस्तहो नमस्कार हा बुद्धीचा खुराक.. खास आपल्या सर्वांसाठी.**

## हसतखेळत

रचनाः-सुरेखा काणे ९९६००५३५२१

**WORD JAGAT (1)**

- वर: घर,HOME
- डावीकडे: हृदय,दिल
- उजवीकडे: घटना,OCCURENCE
- खाली: पक्का,FASTENED,CIOSELY घट्ट

-:सुचनाः-
या चौकोनात पाच अक्षरी इंग्रजी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमानः-दहा कमालः-कितीही

**अंकजगत (1)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | =18 | | | |
| | 5 | 3 | 3 | |
| =18 | 8 | अंकजगत (1) | 9 | =18 |
| | 22 | 11 | 9 | |
| | = 18 | | | |

-:सुचनाः-
प्रत्येक आडव्या व उभ्या रांगेतील पदावलीचे उत्तर 18आहे. त्यासाठी पिवळ्या चौकोनात योग्य चिन्हांची निवड करा.

**शब्दजगत (१)**

- वर: स्वामी विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण×××××
- डावीकडे: हनुमान,वायुपुत्र
- उजवीकडे: सारख्याअंतरावरच्या,
- खाली: त्यानंतर,thereafter

-:सुचनाः-
या चौकोनात पाच अक्षरी मराठी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमानः-दहा कमालः-कितीही


---

## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२**

# सोफिया आणि सहा हंस

**भाग ४**



बालमित्र-मैत्रिणींनो, मी ज्या गोष्टी तुम्हाला सांगते आहे, त्या खूप जुन्या काळातल्या आणि वेगवेगळ्या देशातील आहेत. त्या काळात छोट्या छोट्या परगण्यांमध्ये राजे राज्य करायचे. तेवढ्या भागापुरतं त्यांचं राज्य मर्यादित असायचं. त्या राजांना, आपलं साम्राज्य वाढविण्यासाठी, आपल्या आजूबाजूच्या राजांवर आक्रमण करावं लागत असे. फावल्या वेळात जंगलात जाऊन हिंस्त्र प्राण्यांची शिकार करण्याची त्यांची आवड असे. जर्मनीतील एका परगण्यात घडलेली ही गोष्ट आहे. जोनास राजा तिथे राज्य करत होता. प्रजाहित तत्पर राजा, प्रजेचं हित कशात आहे, तिकडे जातीनं लक्ष देत असे. प्रजाही राजावर मनापासून प्रेम करत असे.

'प्रधानजी, आमची शिकारीला जाण्याची इच्छा आहे. तयारी करा. सर्व लवाजमा तयार ठेवा,' महाराज जोनासनं आज्ञा केली. 'पिताजी आम्हाला वाटतं, आज तुम्ही शिकारीला जाऊ नये. काहीतरी अघटित होणार आहे,' राजकन्या सोफिया म्हणाली.

'होय पिताजी, तुम्ही शिकारीला जाऊ नका. आम्हाला विचित्र संकेत मिळत आहेत,' सहा राजपुत्र एकदम म्हणाले.'आपल्या जंगलातील राजमहालात तुमची राहण्याची व्यवस्था करतो. म्हणजे शिकार झाल्यावर मला लगेच तुम्हाला भेटता येईल.' राजानं सहा राजपुत्र आणि एका राजकन्येला जंगलातल्या महालात हलवलं.

जोनास राजा शिकारीला निघून गेला. त्यादिवशी त्याला एकही शिकार सापडली नाही. शिकारीच्या शोधात राजा एकटाच आपल्या रथात बसून पुढे निघाला. दाट जंगलात गेल्यावर, त्याला परतीची वाट सापडेना. वेगवेगळ्या मार्गानं शोधायचा त्यानं बराच प्रयत्न केला परंतु व्यर्थ! त्या दाट झाडीमध्ये वनस्पती तोडणारी एक वृद्ध स्त्री त्याला भेटली. राजानं तिच्याकडे मदतीची याचना केली.

'राजन, या जंगलाची खडान्खडा माहिती मला आहे. मी तुला जंगलाबाहेरच्या रस्त्यापर्यंत सोडू शकते. मात्र माझी एक अट आहे,' वृद्ध स्त्री म्हणाली.'कोणती अट? तुला सोनं, नाणं, हिरे, माणकं काय पाहिजे ते सांग. मी तशी व्यवस्था करतो,' राजानं सांगितलं.'यापैकी काहीही नाही राजन! माझी एक मुलगी आहे. सुंदर आहे, तरुण आहे. तिच्याशी लग्न करून, तू तिला तुझ्याबरोबर राजदरबारात घेऊन जा,' वृद्ध स्त्रीनं सांगितलं.

राजा विचारात पडला, त्यानं वृद्धेची अट मान्य केली. कारण, त्यानं जंगलाच्या बाहेर पडायचा खूप प्रयत्न केला होता. परंतु, मार्ग सापडला नव्हता. त्या वृद्ध स्त्रीच्या मुलीला घेऊन राजा जंगलाच्या बाहेर सुखरूप पडला. तडक राजदरबारात दाखल झाला. सर्व महत्वाच्या पदांवरील अधिकाऱ्यांना दरबारात हजर रहायला सांगितलं. वृद्ध स्त्रीच्या मुलीला, 'नवी राणी' म्हणून घोषित केलं. नव्या राणीला माहीत नव्हतं की, राजाला सहा मुले आणि एक मुलगी आहे. राजानं आपल्या मुलांना जंगलातल्या राजमहालात नेलं होतं. राजा मुलांना भेटायला राजमहालात गेला.

'माझ्या लाडक्या बाळांनो, तुम्हाला काही दिवस इथेच याच राजवाड्यात रहावं लागेल. तुमची सगळी व्यवस्था मी इकडे केली आहे. दास-दासी, आचारी... तुम्हाला काही कमी पडणार नाही. मी दररोज तुम्हाला भेटत जाईन,' राजा म्हणाला.

'पिताजी, कंटाळा आल्यावर आम्ही थोडं जंगलात फिरलं तर चालेल का?' राजकुमारी सोफियानं विचारलं. 'अलबत! तुमच्या मनात येईल, तेव्हा तुम्ही फिरू शकाल,' राजानं सांगितलं. सोफिया आणि तिचे भाऊ जंगलात खेळू लागले. जोनास राजा, त्यांना भेटायला जवळपास रोजच येऊ लागला.

त्याच्या राणीला राजाचा संशय आला. तिनं आपल्या खाजगीतल्या दासीला, एमिलीला राजाच्या मागावर पाठविले. 'राणीसाहेब, आपले महाराज त्यांच्या मुलांना भेटायला रोज त्यांच्या जंगलातल्या राजमहालात जातात,' इमिलीनं सांगितलं.

राणीला संताप आला. ती वेष बदलून जंगलात गेली. सहाही राजपुत्र राजमहालाच्या बाहेरच्या हिरवळीवर बागडत होते.'राजपुत्रांनो ऐका ऐका...आणलाय जादुचा अंगरखा, याला स्पर्श केल्यावर, काय होतं, पहायचं का?''

राणीने तिच्या हातातला अंगरखा दाखवत विचारलं. राजपुत्रांना अंगरख्याला स्पर्श करण्याचा मोह झाला. साऱ्यांनी अंगरख्याला स्पर्श केला. लागलीच त्यांचं रूपांतर पांढऱ्या शुभ्र हंसांमध्ये झालं. राणीनं तिथून पळ काढला. सोफियानं भावांना हाक मारली. काहीच उत्तर आलं नाही म्हणून ती बाहेर आली तर, सहा पांढरे शुभ्र हंस आकाशात उडताना तिनं पाहिलं. त्यांची मखमली पिसं अंगणात पडली होती. सोफियानं ती उचलून घेतली. नेहमीप्रमाणे जोनास राजा आपल्या मुलांना भेटायला जंगलात आला. हिरवळीवर सोफिया हंसाची पिसं घेऊन रडत बसलेली दिसली. 'सोफिया बाळा, काय झालं तुला? का रडते आहेस? तुझे भाऊ कुठे गेलेत?' त्यानं विचारलं.

सोफियानं रडत रडत सारी हकीकत राजाला सांगितली. 'त्यांच्यावर काहीतरी संकट आलंय. मी त्यांचा शोध लावल्याखेरीज, घरी परत येणार नाही पिताजी,' तिनं सांगितलं. 'बेटा, तू माझ्याबरोबर आपल्या खऱ्या महालात चल. एकटी राहू नकोस,' राजा म्हणाला. 'नाही... मी माझ्या भावांना घेऊनच परत येईन,' तिनं शपथ घेतली आणि ती जंगलात निघून गेली. पूर्ण दिवस जंगलात फिर फिर फिरली. परंतु भावांचा शोध लागला नाही. शेवटी हताश होऊन परत जायला निघाली, इतक्यात तिला एक छोटीशी झोपडी दिसली.

सोफिया झोपडीत गेली. तिथे सहा पलंग दिसले. ती एका पलंगाखाली लपून बसली. आणि काय आश्चर्य सहा पांढरे शुभ्र हंस उडत त्या झोपडीत आले.

त्यांनी त्यांच्या अंगावरचे पिसांचे अंगरखे काढले आणि परत त्यांनी मानवी रूप धारण केले.'दादा...असं काय झालं. म्हणून तुम्हाला हंसांचं रूप मिळालं? सांगा मला सांगा,' सोफियानं पलंगाखालून बाहेर येत विचारलं. तिला पाहून भावांचा आनंद गगनात मावेना.

'सोफिया, हे अंगरखे आमच्या अंगावर टाकून, एका जादुगरणीनं आमचे हंस करून टाकलंय. आम्हाला फक्त रात्री काही तास मानवी रूप धारण करता येतं. एरवी आम्हाला हंसाच्या रूपात वावरायला लागतं,' एका भावानं सांगितलं. 'यावर उपाय काय दादा?' सोफियानं अधीरतेनं विचारलं. 'येती सहा वर्षे काहीही न बोलता, न रडता, न हसता, आमच्यासाठी अंगरखे विणायचे. सहा वर्षांत सहा अंगरखे पूर्ण झाल्यावर, ते आमच्या अंगावर टाकायचे. मग आम्ही पूर्णपणे मानवी रूप धारण करू,' एका भावानं सांगितलं.

'अंगरखे विणायचं काम सोपं नाही सोफिया! तू नको अंगावर घेऊस,' धाकटा भाऊ म्हणाला. 'मला लोकर आणि सुया द्या. मी तुमच्यासाठी काहीही करायला तयार आहे.' सोफियानं थोडं शोधल्यावर तिला सुया आणि लोकर सापडली.

'तू आता इथून निघून जा. आमची हंस होण्याची वेळ झाली आहे आणि इथला मालक जादुगार येण्याची,' एक भाऊ म्हणाला. सहा भावांनी आपआपले अंगरखे चढवले. हंस रूपात ते उडून गेले. सोफिया तिथून बाहेर पडली. एका झाडावर चढून बसली. तिने अंगरखे विणायला सुरूवात केली.

कर्मधर्म संयोगानं, एका नगरीचा राजकुमार शिकारीसाठी त्या जंगलात आला असताना सोफिया त्याच्या नजरेस पडली. त्याने तिला, 'तू कोण, कुठली' असे बरेच प्रश्न विचारले. परंतु तिने तोंडातून अवाक्षर काढले नाही. विणण्याचे कामही सोडले नाही. 'मुकी' समजून राजा तिला आपल्याबरोबर घेऊन गेला. थाटामाटात तिच्याशी विवाहबद्ध झाला. दिवसरात्र सोफियाचं विणकाम चालूच होतं. दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने आणि वर्षांमागून वर्षे गेली. 'राजपुत्रा, तुझी बायको नुसती मुकीच नाही तर, वेडीसुद्धा आहे. तिनं तिच्या पोटी जन्मलेल्या तिन्ही मुलांना जाळून टाकलं. तू आता तिला जळत्या लाकडावर ठेव,' राजपुत्राच्या आईनं म्हणजेच महाराणीनं आज्ञा केली. वास्तविक तिन्ही मुलांना महाराणीनं जंगलात लपवून ठेवलं होतं. सोफियानं सहाही वर्षांत, तोंडातून अवाक्षर काढलं नव्हतं. अपमान निमूटपणे सोसत होती. मुलांना तिच्यापासून तोडल्यामुळे मनातल्या मनात झुरत होती. मात्र, विणकाम चालू होतं. शेवटच्या अंगरख्याचा एका हाताचा भाग विणायचा राहिला होता.

जळत्या लाकडावर तिला बांधून ठेवायची आज्ञा झाली. सहा वर्षे पूर्ण झाल्यामुळे, ती पूर्ण ताकदीनिशी ओरडली,'थांबवा हे सगळं.' सारेजण आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पाहू लागले. इतक्यात सहा हंस उडत उडत खाली आले. सोफियानं, प्रत्येकाच्या अंगावर अंगरखा टाकला. त्यांनी मानवी अवतार धारण केला. सहाव्या राजपुत्राच्या एका हाताच्या जागी एक पंख राहिला. सोफियाने आणि तिच्या भावांनी, राजाला पूर्ण हकिकत सांगितली. महाराणीनं पळवलेली सोफियाची मुलं परत आणली. महाराणीला कैद केलं. सोफिया, राजा, त्यांची मुलं आणि तिचे सहा भाऊ सुखात राहू लागले.

---

## वारसा

**प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२**

# किल्ले खांदेरी



छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ विदर्भातील आणि भोसले कुटुंबीयांचं बराच काळ वास्तव्य मराठवाड्यात पण, पश्चिम महाराष्ट्रात जुन्नर लगतच्या शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला. पुणे सुपे जहागिरीच्या मुलाखात हिंदवी स्वराज्याचा स्वप्न पाहत शिवरायांनी आपलं राज्य सह्याद्रीच्या आश्रयाने वाढवलं. महाराजांनी जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा पाडाव करून नवा मुलुख स्वराज्यात समाविष्ट केला, तेव्हा त्यांची सीमा कोकणातील सागर किनाऱ्याशी जाऊन भिडली. महाराष्ट्राच्या सागर किनाऱ्यावर इंग्लिश, हबशी, पोर्तुगीज, डच आदी परकीय सत्तांनी आपलं बस्तान बसवलं होतं. या सत्तांनी अगदी मोक्याच्या जागा ताब्यात ठेवल्या होत्या. पण, मराठी मुलखात मराठी माणसाचंच राज्य हवं, हे धोरण पुढे रेटण्यासाठी कोकणच्या बाबतीत शिवरायांनी आपलं म्हणणं बरंच खरं करून दाखवलं. त्यासाठी त्यांनी उत्तर व दक्षिण कोकणात अनेक किल्ले ताब्यात आणले, काही नव्याने बांधले. सर्वांचा उपयोग स्वराज्य निर्मिती, स्वराज्यवर्धन व स्वराज्य संरक्षण असाच होता. कोकण किनाऱ्यावर स्वराज्याचे दोन मोठे शत्रू सिद्दी आणि मुंबईचे इंग्रज हे होते. सिद्धी आणि इंग्रजांच्या सागर किनाऱ्यावरच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी ङ्गजंजिरे' बांधण्याचा उपक्रम शिवरायांनी मोठ्या धडाक्याने हाती घेतला. सिंधुदुर्गाची निर्मिती त्यातूनच झाली तसेच खांदेरीचीही!

२८ नोव्हेंबर १६७० रोजी जवळपास तीन हजार सैनिकांच्या साहाय्याने थळ जवळच्या खांदेरी बेटाची पाहणी महाराजांच्या सैन्याने केली. ही पाहणी तीन दिवस चालली. किल्ला उभारणी जरी लगेच झाली नाही तरी, हे बेट ताब्यात ठेवण्याचे धोरण ठरले गेले. मुंबईच्या इंग्रजांना यातील धोका स्पष्ट जाणवला. त्याबद्दल ते म्हणतात,ङ्गशिवाजीच्या हातात खांदेरी असणे म्हणजे मुंबईच्या डोक्यावर टांगती तलवारच आहे.' ९ सप्टेंबर १६७१ च्या पत्रात त्यांनी शिवाजी महाराज खांदेरीवर किल्ला बांधणार असल्याबद्दल आपल्या वरिष्ठांना कळविले होते. २२ एप्रिल १६७२ च्या पत्रात खांदेरी-उंदेरी या बेटांचा हेन्री-केन्री असा उल्लेख केलेला आढळतो.

१४ ऑगस्ट १६७८ रोजी शिवरायांनी खांदेरीवर किल्ल्याचा पाया घातला. त्याच्या आधी राजापुरीजवळ कासा बेटावर पद्मदुर्गाचाही पाया घातला तेव्हा इंग्रजांच्या उरात धडकी भरली व त्यांनी या बेटांचा ताबा मिळवण्याचे ठरविले. २७ ऑगस्ट रोजी इंग्रजांच्या टेहळणी नौकेने खांदेरीच्या संरक्षणाची व्यवस्था करणाऱ्या मायानायक भंडारी यास हे बेट सोडून देण्याचा संदेश पाठवला. त्यावर हे ङ्गबेट आमचे आहे ते सोडून देण्यास सांगणारे तुम्ही कोण?' असा जवाब माया नायकाने दिला. यानंतर थळ ते खांदेरी ही रसदवाट रोखण्यासाठी हंटर ही बोट इंग्रजांनी खांदेरीजवळ ठेवली. शिवाय, इतर तीन नौका हंटरच्या दिमतीस देण्यात आल्या होत्या आणि हे बेट आमच्या (म्हणजे इंग्रजांच्या) मालकीचे आहे व त्यावर शिवाजीने आक्रमण करू नये. त्याचे गंभीर परिणाम होतील असा निरोपही पाठवला. यावेळी खांदेरीवर चारशे मराठी माणसे तट रचण्याचे कार्य करीत होते. ७ सप्टेंबर रोजी एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण झाला होता. शिवाय, मोक्याच्या ठिकाणी तोफा रोखल्या होत्या. आता मात्र लष्करी हालचालींना वेग आला.

११ सप्टेंबर १६७९ रोजी माया नायकाच्या साहाय्याला दौलतखान भलीमोठी कुमक घेऊन आला. १५ सप्टेंबरला रिव्हेंज, हंटर आदी जहाजे घेऊन केग्विन हा नामांकित नौसेनाधिकारी चालून आला. मोठी चकमक झाली आणि इंग्रजांचा त्यात साफ पराभव झाला. १८ ऑक्टोबर रोजी ४०-५० मराठी गलबते नागाव खाडीतून इंग्रज सैन्यावर चालून गेली. थळच्या किनाऱ्यावर केग्विनने रिव्हेंजमधून चांगली लढत दिली. अखेरीस ५-७ गलबते व प्रचंड लूट मराठ्यांना मिळाली. चिडीला आलेल्या केग्विनने १९ ते २३ ऑक्टोबर लहान-मोठ्या चकमकी चालूच ठेवून पोर्तुगीज व सिद्दीचे सहाय्य घेण्यासाठी त्यांच्याशी बोलणी सुरू केली.

१७ नोव्हेंबर १६७९ या दिवशी या युद्धाचं अखेरचं पर्व लढलं गेलं. मराठी आरमाराच्या अर्धचंद्राकृती व्युहात इंग्रजांचं ङ्गडोव्ह' हे गलबत सापडलं. इंग्रज आरमाराचा पुरा फजितवाडा झाला. वीस युरोपियन आणि कैक देशी माणसे युद्ध कैदी म्हणून हाती लागले. अखेरीस २४ डिसेंबर १६७९ रोजी इंग्रजांनी शिवरायांचे प्रभुत्व मान्य केले व १६ जानेवारी १६८० रोजी चौलचा मराठी सुभेदार अण्णाजी याबरोबर तहनाम्यावर सह्या झाल्या.

खांदेरी-उंदेरी हा सारा परिसर अतिशय खडकाळ आहे. खांदेरी बेटावर दोन टेकड्या आहेत. डावीकडील म्हणजे दक्षिणेकडील टेकडी तीस मीटर उंच आहे. त्यावर दीपगृह आहे. बोटींना धोक्याचा इशारा मिळावा म्हणून पंचवीस मीटर उंचीचे षटकोनी दीपगृह १८६७ मध्ये बांधल्या गेले. उजवीकडची म्हणजे उत्तरेकडची टेकडी वीस मीटर उंच आहे. यावरच धक्क्याच्या जवळ श्री वेताळाचे मंदिर आहे. या मंदिरात असलेल्या शिळेला वेताळ असे म्हणतात. परिसरातील लोक नवस फेडण्यासाठी तसेच, वेताळाच्या दर्शनासाठी येथे येतात. गडावर अलिकडची गणेश, हनुमान यांची मंदिरे, बौद्ध मंदिर आदी उभारले आहे. याशिवाय, गडावर महादेवाचे प्राचीन मंदिरही आहे. गडाचे बहुतेक बुरुज अजूनही शाबूत आहेत. गडावर गोड्या पाण्याची विहीर आहे. दोन टेकड्यांच्या मधल्या भागात वाटेवर दौदपीराचे ठाणे आहे. तेथे एका दगडावर आघात केल्यास भांडे वाजवल्याचा (मेटॅलिक साऊंड) आवाज येतो. १९९८ रोजी सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या सन्मानार्थ खांदेरी बेटाचे नाव 'कान्होजी आंग्रे बेट' असे ठेवण्यात आले. खांदेरीचा जलदुर्ग म्हणजे एक अचल युद्धनौकाच आहे.

## बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये कारगिल युद्धामध्ये शहीदांना श्रध्दांजली देवुन 'कारगिल दिन' साजरा



बिडकीन दि २६ जुलै : १९९९ मध्ये लडाखमधील उत्तर कारगिल जिल्ह्यातील पर्वतशिखरांवर पाकिस्तानी सैन्याला त्यांच्या ताब्यातील जागांवरून हाकलून लावण्यासाठी कारगिल युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. याच निमित्ताने आज दि.२६ जुलै रोजी पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतिलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये कारगिल दिन साजरा करण्यात आला. या युद्धा मध्ये शहीद झालेल्या शुरु विरांना श्रद्धांजली वाहुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी आपल्या भाजषाणाद्वारे कारगिल युद्धा मध्ये देशासाठी शहीद झालेल्या शुरविरांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. शाळेमधील स्मार्ट बोर्ड वर विद्यार्थ्यांना कारगिल दिनाचे युद्ध व शहीद शुरविरांची माहिती दाखवण्यात आली. त्याचबरोबर शाळेतिल विद्यार्थ्यांनीही कारगील दिनानिमित्त भाषणे केली. इयत्ता सहावी व सातवी च्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती गाण्यावरती नृत्य केले. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन शाळेची विद्यार्थीनी कनिष्का मढीकर हिने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक दत्तात्रय चेडे व इतर शिक्षक - शिक्षिका, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगितेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे एक पेड मॉ के नाम अभियानांतर्गत वृक्षारोप



बिडकीन दि.२६ जुलै - पर्यावरण संरक्षणासाठी आईच्या नावाने एक झाड प्रत्येकाने लावणे असा या योजनेचा उद्देश असून पीएम मोदी यांनी या अभियानाला सुरवात केली आहे. शासनाने एक पेड मेरे माँ के नाम ही संकल्पना राबविण्याचा निर्धार केला आहे. आईच्या नावाने लावलेले झाड भविष्यात मुलांना नक्कीच सुखाची सावली देईल, यात दुमत नाही. तुम्हाला मायेची ऊब हवी तर मग आईच्या नावे प्रत्येक भारतीयाने एक वृक्ष लावावा आणि त्याला जगवावे. कारण पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी केंद्र शासनाने जनतेच्या खांद्यावर वृक्ष लागवडीची जबाबदारी सोपवली आहे. 'एक पेड मेरे माँ के नाम' ही संकल्पना राबविण्याच्या उद्देशाने शाळेत हा उपक्रम घेण्यात आला व वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेचे शिक्षक वृंद दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, शितल कुमावत, नितीन मोरे सर, वैष्णवी टकेकर, सीमा वंजारे या सर्वांची उपस्थिती होती.

## नृत्यांजली २०२५ भरतनाट्यम सादरीकरणाचा मनोहारी सोहळा

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : मनोहर फाउंडेशनच्या नृत्यासुधा डान्स अकॅडमीमार्फत आयोजित 'नृत्यांजली २०२५' हा कार्यक्रम रविवार, २७ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता संत एकनाथ रंग मंदिर, उस्मानपूरा येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमात भरतनाट्यम मूलगामी कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण होणार असून, त्याचे मार्गदर्शन गुरु प्राजक्ता अपोणारायण यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अविनाश लक्ष्मीनारायण अघाव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्पेशल ब्रांच उडछ, हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात अलारिपु, जातीस्वरम, गणेश कीर्तनम, वर्णम, कृष्ण कीर्तनम, पदम, तिलाना आणि मंगळम यासारख्या नृत्यप्रकारांचा समावेश आहे. रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे

## वेल डन आई १४ नोव्हेंबरला प्रेक्षेकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर - आईवर आधारलेला एक नवा कोरा विनोदी मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'वेल डन आई' असे या चित्रपटाचे शीर्षक आहे. या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. हा चित्रपट १४ नोव्हेंबरला सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

दीपाली प्रोडक्शनची प्रस्तुती असलेल्या 'वेल डन आई' चित्रपटाची निर्मिती सुधीर पाटील यांनी केली आहे. शंकर अर्चना बापू धुलगुडे यांनी या चित्रपटाचे लेखन केले असून, दिग्दर्शनही केले आहे. या चित्रपटात एका अशा आईची गोष्ट पाहायला मिळणार आहे, जी आपल्या मुलावर जीवापाड प्रेम करणारी आहे. मुलाच्या सुखासाठी नवऱ्याशी, जगाशी वैर घेणारी आहे. घरसंसार चालवण्यासाठी खानावळीत काम करण्यासोबतच इतरही छोटे व्यवसाय करणारी ही आई जगातील असंख्य आईंचे प्रतिनिधीत्व करणारी आहे.

## आईकू ने आईकू ज़ेड१0आर लाँच केला

नवी दिल्ली : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आज त्यांचा नवीन स्मार्टफोन आईकू ज़ेड१०आर लाँच केला. हा फोन विशेषतः नवीन युगातील कंटेंट निर्मात्यांसाठी डिझाइन केला आहे जे त्यांचे विचार उत्तम दर्जात टिपू इच्छितात आणि जगापर्यंत पोहोचू इच्छितात. कॅमेरा, कामगिरी आणि डिझाइन - हा फोन प्रत्येक बाबतीत पूर्णपणे सुसज्ज आहे. आईकू ज़ेड१०आर मध्ये सेगमेंटमधील सर्वोत्तम ३२एमपी ४के फ्रंट कॅमेरा आहे जो शार्प आणि उच्च-गुणवत्तेचे सेल्फी, व्लॉग आणि रील्स तयार करण्यासाठी परिपूर्ण आहे. यात एआय इरेज, एआय फोटो एन्हांस, मल्टी-फोकस पोर्ट्रेट आणि अंडरवॉटर मोड सारख्या स्मार्ट कॅमेरा वैशिष्ट्यांसह देखील येते, ज्यामुळे कधीही, कुठेही उत्तम कंटेंट तयार करणे सोपे होते.

## झी ॲक्शन घेऊन येत आहे 'मॉन्स्टर मंडे फेस्टिव्हल'

या मान्सूनमध्ये सज्ज व्हा एका जबरदस्त वादळासाठी - जिथे आग ओकणारे राक्षसी जीव, प्राचीन जादू आणि भव्य लढाया तुमच्यासमोर जिवंत होतील! २८ जुलैपासून, दर सोमवारी संध्याकाळी ७:३० वाजता, झी ॲक्शन सादर करत आहे 'मॉन्स्टर मंडे फेस्टिव्हल' - थरारक राक्षसी सिनेमांचा धमाकेदार संगम! प्रत्येक आठवड्यात पाऊल ठेवा रोमांचक जगात - जिथे धोकादायक जंगले, अंगावर काटा आणणारी गूढ बेटे आणि प्रचंड राक्षसांची गजबज आहे. सामोरे जा भीषण राक्षसांना, सामिल व्हा धडाडीच्या योद्ध्यांसोबत आणि अनुभवा श्वास रोखून टाकणाऱ्या लढाया - हे सगळे तुमच्या टीव्हीवर!

## महत्त्वाचे कागदपत्रे हरवले

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी पार्थ गणेश भापकर रा. गंगापुर जि. छ. संभाजीनगर, येथील रहिवासी असून माझे फायनल मार्क्स मेमो, मायग्रेशन सर्टिफिकेट व टि.सी.. इत्यादि ओरीजनल कागदपत्रे दि. २२/७/२५ रोजी सकाळी १०.३० वाजता गंगापूर येथे पवासाच्या दरम्यान गाहाळ झाली आहेत. कुणाला सापडल्यास खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

भ्रमणध्वनी क्रमांक - ७०३५४५२१२१

# अत्याधुनिक यंत्रणेची कास धरा : आ. बंब

## शिरेगाव येथे पहिल्या फवारणी ड्रोन चे उदघाटन

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे गंगापूर खुलताबाद तालुक्यातील शेतकरी बांधवांनी शेती करताना अत्याधुनिकरण तसेच यांत्रिकीकरणाची कास धरून आपला वेळ व पैसा वाचवून विकास साध्य करणे गरजेचे आहे. शिवाय योग्य प्रकल्प निवडून युवकांनी व महिलांनी शेती पूरक उद्योगाकडे वळले पाहिजे. असे आवाहन आमदार प्रशांत बंब यांनी केले. आहे

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कृषी यांत्रिकीकरण व महिला सबलीकरणासाठी शिरेगाव (ता.गंगापूर) येथून जयश्री गजानन कुकलारे यांना स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने आमदार प्रशांत बंब यांच्या पाठपुराव्याने शेती फवारणी ड्रोनचा लाभ देण्यात



आला असून त्या ड्रोनचे उदघाटन आमदार बंब यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील हा पहिलाच ड्रोन देण्यात आला असून महिला या ड्रोनला उडवत असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान बंब यांनी ड्रोन कंपनीकडून ड्रोनच्या बाबत सविस्तर माहिती घेतली. व स्वतः ड्रोन उडवत त्यांनी सुमारे दीड एकर शेतामध्ये फवारणी करून फवारणी ड्रोनच्या प्रात्यक्षिकाचे धडे घेतले. शिरेगाव ल येथील जयश्री कुकलारे यांनी या ड्रोनचे यशस्वी प्रशिक्षण घेऊन ड्रोन उडवण्याचा परवाना देखील घेतला आहे. या ड्रोनच्या माध्यमातून आपल्या स्वतःच्या शेतीचे काम करून बाकीच्या शेतामध्ये देखील भाडेतत्त्वावर ड्रोन मिळणार आहे. ज्यामुळे वेळ आणि पैसा वाचणार असून फवारणी दरम्यान शेतकऱ्यांना होणाऱ्या दुखापतीपासून, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सुटका देखील मिळणार आहे. यावेळी लासुर बाजार समितीचे सभापती शेषरावनाना जाधव, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक नंदकुमार गांधीले, भारतीय जनता पक्षाच्या महिला आघाडी तालुका अध्यक्ष शिला गाढे, बाजार समितीचे संचालक संतोष जाधव, नंदकुमार कुकलारे, अनिल चव्हाण, दत्तू कऱ्हाळे तसेच शिरेगाव येथील ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृक्ष लागवड करून निसर्गाचा समतोल राखणे हे आपले आद्य कर्तव्य : प्रा.निलेश पाटील

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२६ जुलै

सद्यस्थितीत आपण सर्वजण ऋतुचक्र बदलाचा अनुभव घेत आहोत. वृक्ष लागवडीबाबत शासन यंत्रणेकडुन अनेक प्रयत्न केले जातात.दरवर्षी अनेक माध्यमातून वृक्ष लागवड केली जाते.परंतू या सर्व प्रयत्नांना नागरीकांचा म्हणावा तसा सहभाग मिळत नाही.लोक याकडे केवळ शासनाची एक योजना म्हणून पाहतात.सामाजिक दायित्व म्हणून आपण वृक्ष लागवड उपक्रमात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात हरित अच्छादन वाढविण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री,



महाराष्ट्र राज्य यांनी सन.२०२५ च्या पावसाळ्यासाठी एकूण १० कोटी वृक्षलागवड करण्याचे निर्देश दिलेले आहेत.तसेच पंतप्रधान यांचे निर्देशानुसार 'एक पेड माँ के नाम'ही संकल्पना राबविण्यात येत आहे.वृक्ष लागवड करून निसर्गाचा समतोल राखणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक निलेश पाटील यांनी केले.ते शाळेत 'एक पेड माँ के नाम 'अभियान प्रसंगी बोलत होते. उपमुख्याध्यापक एलिस यांनी सामाजिक वनीकरण विभागाने वेळेत विनामूल्य रोपांची उपलब्धता करुन दिल्याबद्दल आभार मानले.उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी संस्था प्रतिनिधी कमलेश काळे,प्रा. दादासाहेब पवार,उपमुख्याध्यापक प्रा.ज्ञानेश्वर एलिस, पर्यवेक्षक सागर घाटे,प्रा.योगेश काळे,प्रा.मंगेश निकम, शिक्षिका मनिषा पाटील,सीता पगार,जयश्री श्रीवास्तव, आशा गणगे,अंजली कथलकर,रुपाली मानकर,रोहिणी पाटील,रंजना जाधव,उषा ढेपले,नलिनी पाटील उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानेश्वर पंडित,रमेश कंडारे,सुनीता जाधव यांनी परिश्रम घेतले.

## मांगलिक कलश स्थापनेचा कार्यक्रम सपन्न

छत्रपती सभाजीनगर - श्री पार्श्वनाथ ब्रह्मचारी आश्रम जैन गुरुकुल वेरूळ येथे परमपूज्य १०८ विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य परमपूज्य १०८ नियम सागर महाराज, ऋषभ सागर महाराज, अभिनंदन सागर महाराज, सुपार्शसागर सागर महाराज, यांचा मांगलिक कलश स्थापनेचा कार्यक्रम नुकताच पार पाडण्यात आला. यावेळी महाराजांनी निश्चितपणे नरक गती गतीपासून मुक्ती मिळवून नियमाने आपण देवगती अथवा मोक्ष गती प्राप्त करू शकाल व हाच जीवन सुखमय करण्याचा उत्तम मार्ग आहे. यामध्ये अरिहंत परमेष्टी कळसाच्या मान छत्रपती संभाजीनगर येथील संस्थेचे विश्वस्त दिनेश पन्नालाल गंगवाल यांना प्राप्त झाला तर दुसरे परमेष्टी सिद्ध भगवान कलशाचा मान बारामती या ठिकाणी प्रसिद्ध उद्योजक अतुल आशिष शहा यांना मिळाला. तर आचार्य कलशाचा मान श्रीमती निकेतन जी कासलीवाल तर उपाध्याय परमेष्टी कळसाचा मान शितल सरलाजी पहाडे यांना मिळाला. साधू परमेष्टीचा मान निधी प्रमोद शास्त्री चिंचवड पुणे यांना मिळाला याशिवाय मांगलिक कलशाच्या सौभाग्य वेरूळ येथील संस्थेचे महामंत्री डॉ प्रेमचंद पाटणी डॉ सारंग पाटणी व सागर पाटनी यांनी मंगल कलश प्राप्त केला तर सज्जनपूर येथील गौतमचंद ठोळे व चेतन ठोले यांनी देखील मंगल कलशाची सौभाग्य मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंडित मनीष , निर्मल कुमार ठोले, सुकुमार नवले, गुलाबचंद बोराळकर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चातुर्मास मास कमिटी सदस्य स्वप्निल ठोले महावीर कासलीवाल , राजू पाटोदि ,संजय महाजन, सचिन अन्नदाते, अंकुश ठोले, अरुण तपशी, विनोद कान्हेड ,आशिष कान्हेड, सुहास मिश्रीकोटकर, पारस जैन, दीपक जैन, अशोक सोनवणे, प्रदीप माद्रप, सिद्धी दगडे, प्रतिभा गंगवाल, जयश्री पाटणी, कैलास गोरे, वीरेंद्र वाकळे,महेंद्र वाकळे, राजकुमार नरखडे, संतोष जैन, आनंद गगवाल, विजय हणमंते,विक्रांत करेवार मयूर जैन, पलाश पाटणी,ऋषभ बांदे, संतुलन शहा, स्वराज्य साहूजी निपुण कान्हेड आयुष पांडे प्रदीप मोदी, खुशाल भय्या रानू भैय्या यांचे योगदान लाभले अशी माहिती अतुल बादे सूहास मिश्रीकोटकर पियूश कासलीवाल नरेंद्र अजमेरा यानी दिली

## गरोदरपणात हिपॅटायटीस: दोन जीवांना (स्त्री आणि मूल) एक छुपा धोका - डॉ. राहुल गोसावी

छत्रपती संभाजीनगर - मेडिकव्हर महिला आणि बाल रुग्णालयांमध्ये, आम्हाला विश्वास आहे की प्रत्येक गर्भधारणा सुरक्षित आणि निरोगी प्रवासाची पात्रता असते - परंतु जर निदान झाले नाही तर, हिपॅटायटीस बी आणि सी आई आणि बाळ दोघांनाही धोका निर्माण करू शकतात.

भारतात हिपॅटायटीस बी हा दीर्घकालीन यकृताच्या आजाराचे एक प्रमुख कारण आहे, जो ४ कोटींहून अधिक लोकांना प्रभावित करतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, प्रजननक्षमतेच्या वयातील अनेक महिलांना त्यांच्या हिपॅटायटीसच्या स्थितीबद्दल माहिती नसते आणि नियमित प्रसूतीपूर्व तपासणी अजूनही सार्वत्रिक नाही.



यामुळे आईपासून बाळाला संसर्ग होण्याचा धोका वाढतो, विशेषतः प्रसूतीदरम्यान.

आमच्या हायटेक सिटी युनिटमध्ये आम्ही अलिकडेच तिसऱ्या तिमाहीत असलेल्या एका तरुण गर्भवती महिलेवर उपचार केले. तिला कोणतीही लक्षणे नव्हती - फक्त सामान्य गरोदरपणातील थकवा. वेळेवर प्रसूतीपूर्व तपासणी केल्यावर तिला हेपेटायटीस बी पॉझिटिव्ह असल्याचे दिसून आले. योग्य काळजी योजना, सुरक्षित प्रसूती आणि १२ तासांच्या आत बाळासाठी जन्म-डोस लस आणि इम्युनोग्लोबुलिन यामुळे, बाळाची हिपॅटायटीस बी चाचणी नकारात्मक आली - लवकर निदान परिणाम कसे बदलते याची एक शक्तिशाली आठवण.


या हिपॅटायटीस दिनानिमित्त, आम्ही सर्व गर्भवती पालकांना आणि आरोग्य सेवा प्रदात्यांना आवाहन करतो: हिपॅटायटीस चाचणी ही प्रसूतीपूर्व काळजीचा एक नियमित भाग बनवा. कारण आयुष्यभर यकृताच्या आजाराचा प्रतिबंध जन्मापासूनच सुरू होऊ शकतो - फक्त एक चाचणी, एक लस आणि वेळेवर कारवाईने. मेडिकव्हर हॉस्पिटल मध्ये, आम्ही दोन्ही जीवनांचे रक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहोत - तुमच्याकडे असलेले जीवन आणि तुम्ही ज्याची कदर करता.

# शिवाजीराव काळे यांची पुण्यतिथी साजरी



पैठण दि २६ :- पैठणचे माजी आमदार तथा शिवाजी नागरी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय शिवाजीराव काळे यांची पुण्यतिथी शिवाजी बँकेच्या मुख्य सभागृहात साजरी करण्यात आली. बँकेचे चेअरमन रवींद्र काळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच नांदर येथे शिवाजी शुगर व कै. पुष्पाबाई काळे दूध उत्पादक संस्था यांच्या वतीने ही त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्हा. चेअरमन भाऊसाहेब पा. औटे, हरिपंडित गोसावी, पाशा धांडे, रामचंद्र काळे, अशोक जाधव,शाम लोहिया, राजेंद्र टेकाळे,पृथ्वीराज चौहान, दशरथ सोनवणे,सोमनाथ जाधव, अँड किशोर वैद्य, दत्तात्रय फटांगडे. याप्रसंगी मित्रवर्धन काळे, उदय काळे , हसनोद्दीन कट्यारे, अंबादास ढवळे, राजू परदेशी, किशोर चोधरी,बाबा राऊत, फाजल टेकडी, स्वदेश पांडे, प्रकाश निवारे, नरसिंग लोहिया, गणेश पवार, अप्पा मिसाळ, मच्छिन्द्र मिसाळ, गोटू पा. काळे, रमेश ठाणगे, उस्मान आतार, बाळू राऊत, बप्पा सोनवणे, विठ्ठल तळपे, याकूब पठाण यशवंत काळे, प्रमोद काळे, लखन भावले, ज्ञानेश्वर पानखडे, बोधने मामा, बबन तुपे, हरी राऊत, विष्णू बोडखे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी ई. आय. पठाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जी. व्ही. म्हस्के, विजय पोषणगीर, सुधाकर शिंदे, विलास डफळ, बाळू दसपुते, कृष्णा काकडे, ईश्वर ढोकळे, रत्नदीप मुळे, सौ. रेवती राजनिकर, मेघा श्रीवास्तव, सुभद्रा सोंडगे, पवन काळे, अमर तावरे, अमोल काळे, जगदीश गोर्डे, किशोर धोकते, कडुबाल कोरडे,नारायण राऊत, युसूफ पठाण, समीर आठवले,दत्ता मोरे, गणेश काळे, माऊली तळपे, आबेद पठाण, भाऊसाहेब कणसे, आशिष पवार, फौजदार जाधव, अन्सार सय्यद, भगवान तांबे,मंदा मोरे आदी उपस्थित होते.

## कवी.माणिक सोनवणे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदची उत्तर महाराष्ट्र सरचिटणीसपदी निवड



सोयगाव,दि.२६ जुलै : सोयगाव येथील प्रसिद्ध ग्रामीण कवी.माणिक सोनवणे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस या पदासाठी नियुक्तपत्र देऊन निवड करण्यात आलेली आहे.कवी माणिक सोनवणे हे त्यांच्या ग्रामीण गावबोली भाषेत लिखाण करीत असतात. त्यांनी त्यांच्या गावबोली भाषेच्या जोरावर संबंध राज्य व राज्यबाहेर एक वेगळा साहित्य क्षेत्रात ठसा उठविलेला आहे.वेगवेगळ्या साहित्य क्षेत्राच्या माध्यमातून त्यांना काव्यप्रतिभा,काव्यभूषण,साहित्यरत्न,कार्यगौरव पुरस्कार प्राप्त झालेले आहेत,तर राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय महाकाव्य काव्य लेखन स्पर्धेतून प्रथम क्रमांकानी उत्तीर्ण होऊन प्रथम क्रमांकाचे पुरस्कार मिळून मानकरी झालेले आहेत.तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या निवड समितीने साहित्य संमेलनात कविता सादर करण्यासाठी कवी माणिक सोनवणे यांच्या कवितेची निवड सलग तीन वर्षे सातत्याने करण्यात आलेली आहे.ह्याच कार्याची दखल घेत हेच कार्य सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील आपल्या भरीव योगदानाची बाजू घेत अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस पदासाठी निवड करण्यात आलेली आहे.त्यांनी त्यांच्या कुशलतेने साहित्य परिषदेचे कार्य समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचवीत,अवीरतपणे कार्यरत ठेवावे असे देण्यात आलेल्या नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले आहे.सदरील नियुक्तीपत्र अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे,उपाध्यक्षा शुभांगीताई काळभोर यांच्या सह्या सहित पाठविण्यात आले आहे.

## जय भद्राच्या गजराने खुलताबाद नगरी दुमदुमली

खुलताबाद प्रतिनिधी - भाविकांच्या नवसाला पावणारा भद्रा मारुती महाराष्ट्रातील एकमेव निद्रा अवस्थेत असलेल्या स्थळ म्हणून प्रसिद्ध असून या ठिकाणी शुक्रवारी संध्याकाळपासूनच राज्यभरातून येण्यास सुरुवात होते श्रावणच्या पहिल्या शनिवारी अनेक भाविकच्या दिंड्या दाखल होतात प्रमुख्याने छत्रपती संभाजी नगर. जालना अहिल्यानगर शिर्डी .नाशिक.शहादा .चाळीसगाव.सह अनेक ठिकाणचे भाविक भक्त येतात आलेल्या भाविकांसाठी संस्थांच्या वतीने महाप्रसाद फिल्टर पाणी ची व्यवस्था केली असून अभिषेक व्ही आय पी दर्शन बंद करून येणाऱ्या सर्व भाविकांचे दर्शन लवकर व्हावे यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या सर्व नियमाचे पालन करून सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती संस्थांचे वतीने महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल मोरेश्वर सावे खा. चंद्रकांत खैरे अध्यक्ष मिठू पाटील बारगळ जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्या सह संस्थांच्या वतीने देण्यात आली आहे

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३६४/२०२५ पुढील तारीख ०८/०९/२०२५

अर्जदार : १- पंजाबाई भ्र. शामराव साळवे, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम, रा. खामगाव ता. कन्नड ह.मु. फेस-१, उमीया कॉप्लेक्स गणेश मंदीर रोड, मांडा टिटवाळा कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे, २- मनोज पि. शामराव साळवे, वय ४५ वर्षे, धंदा- मजुरी, रा. खामगाव ता. कन्नड ह.मु. फेस-१, उमीया कॉप्लेक्स गणेश मंदीर रोड, मांडा टिटवाळा कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे, ३- रवि पि. शामराव साळवे, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. खामगाव ता. कन्नड ह.मु. फेस-१, उमीया कॉप्लेक्स गणेश मंदीर रोड, मांडा टिटवाळा कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे, ४-कविता भ्र. जितेंद्र भालेराव, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गौतम कॉलनी मालेगाव, स्टँड पंचवटी नाशिक, ता. जि. नाशिक ५- सविता भ्र. राजु जाधव, वय- ३३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वसंतनगर टिटवाळा, ईस्ट कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये, वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. एस. बोरसे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळविण्याकरीता अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत शामराव नाथाजी ऊर्फ नाथा साळवे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ५ हे त्यांची मुले आहेत. मयत शामराव साळवे हे मुळचे खामगाव ता. कन्नड येथील रहीवाशी आहेत, मयत शामराव साळवे एम.टी.एन.एल. (महानगर टेलीफोन निगम लिमीटेड) छत्रपती शिवाजी टर्मीनल मुंबई येथे कार्यरथ असल्यामुळे वरील पत्यावर राहत होते व आहे. मयत शामराव नाथाजी ऊर्फ नाथा साळवे हे दिर्घ आजाराने दिनांक २९/१२/२०२४ रोजी ममता हॉस्पीटल कल्याण डोंबीवली कल्याण ठाणे येथे मयत झालेले आहे, त्यांचे अर्जदार क्र. १ ते ५ हे कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नाही. अर्जदार वरील प्रमाणे मयत शामराव नाथाजी ऊर्फ नाथा साळवे यांच्या मृत्यु पश्चात मुळ गाव खामगाव ता. कन्नड व मांडा टिटवाळा कल्याण, ता. कल्याण जि. ठाणे, येथील वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकिय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे. असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक ०४/०७/२०२५ रोजी कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक /०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ, कन्नड़ यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः ३६५/२०२५

पुढील तारीख ४/९/२०२५

अर्जदार - १- मोहनसिंह कल्याणसिंग ठाकुर, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. कनकावतीनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ह.मु. निरंजन पार्क, संत वामनभाऊ नगर, तपोवन रोड, घर नं. ८, प्लॉट नं. ५४ ते ५८/५. श्री. वरद सावेडो, अहमदनगर, २- ओंकारसिंह कल्याणसिंग ठाकूर, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. कनकावतीनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३- मनिषा भ्र. शिवदत्त परदेशी, वय ४७ वर्षे, चंदा घरकाम, रा. घर नं. ए/२, बी/४७. सुपर इंदीरानगर, बिबवेवाडी रोड, दुर्गामाता गार्डन जवळ, बिबवेवाडी, पुणे शहर, पुणे.

- विरुध्द -

गैर अर्जदार - निरंक

अर्ज - कायदेशीर बारस प्रमाण पत्र लिगल हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणे बाबत. (THE BOMBAY REGUTATION VIII, 1827, SEC 2)

ज्याअर्थी अर्जदार यांनो त्यांचे विधीज्ञ व्ही. के. मोहित यांच्या मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ३ याच वडोल कल्याणसिंग बजरंगसिंग (मिस्तरी) ठाकुर हे दिनांक ०१/१२/२०२३ रोजी मौजे कनकावली नगर, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहेत, तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई सुमनबाई कल्याणसिंग ठाकुर या दिनांक २८/०६/२०११ रोजी मौजे कनकावतीनगर, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर येथे मगत झाले आहेत. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारों शिवाय मयतांना कोणीही इंतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र है शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार र मागणी करीत आहे. सबब अर्जास कारण १५/०७/२०२५ रोजी घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहोर प्रगटन.

दिनांक २१/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि.अर्ज नं. ३६४/२०२५

अर्जदार : १. जिजाबाई भ्र. रामराव बनसोडे, वय ७५ वर्ष, धंदा शेती व घरकाम, रा. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. राजु पि. रामराव बनसोडे, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. वंदना भ्र. संतोष मोरे, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा. सुवर्ण पालेश्वर कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. विजय पि. रामराव बनसोडे, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार नं. १ ते ४ हे मयत रामराव गणपत बनसोडे, यांचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोरसे, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील हे मयत रामराव गणपत बनसोडे हे होते व ते मौ. भिमनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होते. ते अल्पश्या आजाराने दि. २५/४/२०२५ मध्ये मयत झालेले आहेत. त्यांना कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ४ हे होते व आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच त्याबाबत त्यांचे मृत्यु प्रमाण पत्र सोबत दाखल केले आहे.

तसेच सदर वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व अन्य कामा करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ ते ४ हे एकाच कुंटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ४ यांची स्वइच्छेप्रमाणे संमत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार नं. १ ते ४ हे मयत रामराव गणपत बनसोडे यांचे कायदेकशीर वारस आहे यांचे कायदेशीर वारस आहेत. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

आज दि.२२/७/२०२५ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## अग्रलेख...

# गोंधळींना धडा शिकवलाच पाहिजे

संसदेचे पावसाळी अधिवेशन अपेक्षा आणि लौकिकाप्रमाणे वादळी ठरत आहे. विरोधकांच्या गदारोळाच्या पावसात या अधिवेशनाचा पहिला आठवडा वाहून गेला. आता किमान दुसऱ्या आठवड्यापासून तरी अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालले पाहिजे, अशी देशातील जनतेची स्वाभाविक अपेक्षा आहे. या अपेक्षेला विरोधी पक्ष उतरतो की नाही, ते पुढील आठवड्यातच समजू शकेल. पहिल्या दिवशी अधिवेशनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी संसद भवनात आले असता विरोधकांच्या सर्व मुद्यांवर चर्चा करायला सरकार तयार असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला होता. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीतही सरकारने चर्चेची आपली भूमिका स्पष्ट केली. तरी विरोधकांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच गोंधळ घालायला सुरुवात केली. मुळात विरोधकांना काय हवे ते समजत नाही. पहलगाम येथील अतिरेकी हल्ला तसेच त्यानंतरचे ऑपरेशन सिंदूर यावरून विरोधकांनी विशेषत: काँग्रेस पक्षाने सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. ऑपरेशन सिंदूरवरून अनेक प्रश्न विरोधक उपस्थित करत आहे. सरकारने ऑपरेशन सिंदूरवर दोन्ही सभागृहांत चर्चेची तयारी दर्शवली आहे. मोदी सरकारजवळ लपवण्यासारखे काही नाही, त्यामुळे विरोधक उपस्थित करत असलेल्या कोणत्याही मुद्यावर सरकार चर्चेस तयार असल्याचे दिसते. प्रश्न हा आहे की, विरोधक खरोखरच चर्चेस तयार आहे की त्यांना संसदेच्या दोन्ही सभागृहांत नुसता गोंधळ घालायचा आहे?

संसद हे भारतीय लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर आहे. कोणत्याही मंदिरात जाताना आपण जसे वागत असतो, तसेच लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात पाय ठेवतानाही आपली भूमिका अशीच असली पाहिजे. मंदिरात जाताना सर्व जण मंदिराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करतात. आपल्याकडून अनवधानानेही मंदिराचे पावित्र्य भंग होणार नाही, याची काळजी सर्व घेत असतात. तशीच भूमिका संसदेतही सर्व राजकीय पक्षांनी विशेषत: विरोधी पक्षांच्या खासदारांनी ठेवली पाहिजे. दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधक घोषणाबाजी सुरू करतात, पोस्टर्स फडकवतात, एवढेच नाही तर सरकारी कागदपत्राचे तुकडे करत अध्यक्षांच्या आसनाच्या दिशेने भिरकावतात. वर्गात शिक्षक नसताना विद्यार्थी जसा गोंधळ घालतात, वर्ग डोक्यावर घेतात, तशीच काहीशी वागणूक संसदेत विरोधकांची असते. फरक इतकाच की विद्यार्थी वर्गात शिक्षक नसताना गोंधळ घालतात आणि विरोधक आसनावर अध्यक्ष वा सभापती विराजमान असताना गोंधळ घालतात. हा प्रकार विरोधकांना विशेषत: काँग्रेसच्या सदस्यांना शोभणारा नाही. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी याबाबत नुकतेच सदस्यांचे कान टोचले आहेत. पण विरोधकांची कृती पालथ्या घड्यावर पाण्यासारखी असते. संसदेचे कामकाज सुरळीत चालवणे ही सरकारची जबाबदारी आहे, यात शंका नाही. पण ज्याप्रमाणे टाळी एका हाताने वाजू शकत नाही, त्याप्रमाणे विरोधकांच्या सहकार्याशिवाय सरकारही संसदेचे कामकाज सुरळीत चालवू शकत नाही. ग्रामीण भाषेत सांगायचे तर लोकशाहीच्या गाड्याचे सरकार आणि विरोधी पक्ष ही दोन चाके आहेत. त्यामुळे संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्याचा सरकारने आपल्या परीने कितीही प्रयत्न केला तरी विरोधकांनी मदतीचा आणि सहकार्याचा हात समोर केल्याशिवाय ते शक्य नाही. बरं ज्या मुद्यांवर विरोधक गोंधळ घालतात, ते मुद्दे तरी महत्त्वाचे असतात का? तर त्याचेही उत्तर नकारार्थी असते. भाजपही विरोधी पक्षात असताना असाच गोंधळ घालत होता. सभागृहाचे कामकाज ठप्प पाडत होता, असा आरोप आपल्या गोंधळाचे समर्थन करताना विरोधी पक्ष करतात. पण भाजप सदस्य त्यावेळी सरकारमधील मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून सभागृह डोक्यावर घेत होते, कामकाज ठप्प पाडत होते. त्यामुळे या दोन गोंधळामध्ये गुणात्मक फरक आहे.

जो प्रकार संसदेत होतो, तोच राज्यांच्या विधानमंडळातील दोन्ही सभागृहांत म्हणजे विधानसभा आणि विधान परिषदेतही होत असतो. बिहार आणि उत्तरप्रदेश विधानसभेत तर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांमध्ये हाणामाऱ्याही झाल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर संसदेत अजून हाणामाऱ्या झाल्या नाहीत, याबद्दल समाधान व्यक्त करायला हरकत नाही. मात्र आपल्या अनेक लोकप्रतिनिधींची सध्याची वर्तणूक पाहता तो दिवस फारसा दूर नाही, असे वाटते. तामिळनाडू विधानसभेत काही वर्षांपूर्वी द्रमुकच्या सदस्यांनी अण्णाद्रमुकच्या जयललिता यांच्यावर हल्ला करण्याचा, त्यांची साडी ओढण्याचाही प्रयत्न केला होता, असे म्हणतात. आज कोणत्याही लोकनिर्वाचित सभागृहाची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. अगदी ग्रामपंचायतीपासून नगर परिषदेची बैठक असो, जिल्हा परिषदेची बैठक असो की महानगर पालिकेची, या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठकीत गोंधळ हा आवश्यक असतो.आजकाल गोंधळ आणि गदारोळ झाल्याशिवाय विधिमंडळाचे आणि संसदेचे कामकाज झाल्यासारखे वाटतच नाही. जगातील अनेक देशांच्या संसदेत तर हाणामाऱ्या होत असतात. आपल्या संसदेत अजून तसा प्रकार होत नाही, ही समाधानाची बाब म्हटली पाहिजे. मुळात आपल्याला जनतेने त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांना आणि समस्यांना वाचा फोडण्यासाठी निवडून दिले आहे, याचा सर्वच राजकीय पक्षांच्या विशेषत: विरोधी पक्षांच्या सदस्यांना विसर पडल्यासारखा वाटतो. आपल्याला सभागृहात गोंधळ घालण्यासाठी, गुंडागर्दी करण्यासाठीच निवडून दिले, असा विरोधी पक्षांच्या सदस्यांनी समज करून घेतला आहे की काय, अशी शंका येते. गेल्या दहा-वीस वर्षांत हा प्रकार नियमित झाल्यासारखा दिसतो. त्याआधी राज्यांची विधानसभा असो की देशाची संसद या ठिकाणी अभ्यासपूर्ण भाषणे आणि चर्चा व्हायच्या. काही काही विरोधी पक्षनेत्यांची भाषणे ऐकायला मुख्यमंत्री आणि अगदी पंतप्रधानही तेव्हा सभागृहात उपस्थित राहत. तेव्हा सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष, दोघेही समाजाचा आणि देशाचा हिताचा विचार करायचे. देशातील गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी आपण निवडून आलो, त्यामुळे या जनतेला न्याय मिळवून देण्याची अशीच सर्वांची भूमिका असायची. पण आता मात्र विरोधकांनी ताळतंत्र सोडला, असे अतिशय नाईलाजाने म्हणावेसे वाटते. विरोधकांची वागणूक ही कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्यासारखी झाली आहे. जनतेच्या एखाद्या मूलभूत प्रश्नासाठी, समस्येसाठी, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी वा समाजाच्या आणि देशाच्या व्यापक हितासाठी विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातला, तर एकवेळ ते क्षम्य समजता येईल, पण आज विरोधक स्वत:च्या किरकोळ राजकीय फायद्यासाठी गोंधळ घालत असतात. आपण सरकारचे विरोधक आहे, देशातील जनतेचे, पर्यायाने समाजाचे आणि देशाचे विरोधक नाही, याचे भान विरोधी पक्षांनी ठेवले पाहिजे. सरकार आणि विरोधी पक्ष हे लोकशाहीरूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत. लोकशाहीत विरोधी पक्ष आवश्यक असतो. विरोधी पक्षांशिवाय लोकशाहीची कल्पनाही आपण करू शकत नाही. सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्ष आवश्यक असतो. जसे एखाद्या हत्तीला नियंत्रित करण्याचे काम अंकुशाच्या माध्यमातून त्यावरील माहूत करत असतो, तशीच भूमिका लोकशाहीत विरोधी पक्षांकडून अपेक्षित असते. सरकार चुकत असेल वा जनतेच्या हिताच्या विरोधात निर्णय घेत असेल तर सरकारला वठणीवर आणायचे काम विरोधी पक्षांचे असते. पण विरोधी पक्ष म्हणून आपण सरकारच्या प्रत्येक गोष्टीला विरोध करणे, मग तो निर्णय जनहिताचा असला तरी त्याला विरोध करणे विरोधी पक्षांकडून अपेक्षित नाही. चुकीचे वागणाऱ्या लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे, अशी मागणी काही वर्षांपूर्वी केली जात होती. आज संसदेतील विरोधी पक्षांची बेताल वागणूक पाहून असा कायदा करण्याची वेळ आली आहे, असे वाटू लागले आहे. सरकारला वठणीवर आणण्याची जबाबदारी विरोधी पक्षांची असते, असे म्हणतात. पण सध्या दिशाहीन विरोधकांना वठणीवर आणण्याची जबाबदारी जनतेची आहे. जनतेने बेताल आणि मर्यादा सोडून वागणाऱ्या विरोधी पक्षांच्या सदस्यांवर चाबूक उगारण्याची वेळ आली आहे.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# पुरोगामी आहेत कुठे?

आपल्याकडच्या तथाकथित छद्म पुरोगामी मंडळींचे एक बरे असते, खोट्याला सत्य म्हणत ते बेंबीच्या देठापासून ओरडत असतात. मात्र सत्य परिस्थितीबाबत ते सराईतपणे मौन बाळगून असतात. सरडा आणि लांडगा या प्राण्यांना लाज वाटेल इतक्या सहजपणे ते रंग बदलू आणि लबाड असतात. या मंडळींनी भारतातल्या मूळ शत्रूकडे दुर्लक्ष करत हिंदू समाजाला सर्वांचा शत्रू म्हणून प्रस्तुत केले आणि त्यात त्यांना बऱ्यापैकी यशही मिळाले. म्हणजे हिंदू विरुद्ध बौद्ध, हिंदू विरुद्ध आंबेडकरी समाज, हिंदू विरुद्ध जनजाती, हिंदू विरुद्ध द्रविड, हिंदू विरुद्ध मूळ निवासी, हिंदू विरुद्ध आदिवासी, हिंदू विरुद्ध मराठी-तमिळ-कन्नड भाषिक इत्यादी इत्यादी इत्यादी... अशा विविध प्रकारे खोटा प्रचार करून हिंदू समाजाला बदनाम केले. भारतात बौद्ध धम्माला उतरती कळा लागली याबाबत बोलताना हे म्हणतात की हिंदूंनी बौद्धांवर अत्याचार केले. मुळात हिंदुस्थानात अनेक पंथ गुण्यागोविंदाने नांदले, वाढले. इतकेच काय बाहेरून आलेली इस्लामी आणि ख्रिस्ती संस्कृती देखील या मातीने पोसली. बुद्ध की कृष्ण असा वाद निर्माण करून यांनी द्वेष पसरवण्याचं काम केले. पण सत्य परिस्थिती अशी आहे की इथे बुद्ध आणि कृष्ण हातात हात घालून फिरतात. अंतर्गत शत्रूशी लढायचे असेल तर बुद्ध आणि बाह्य शत्रूशी दोन हात करायचे असतील तर कृष्ण ही सर्वसामान्य जाणीव भारतीय जनतेला आहे. पण जनतेच्या मनात गोंधळ माजवण्याचं काम या छद्म पुरोगाम्यांनी केलेले आहे. मात्र अफगाणी लोकांनी आणि चिनी लोकांनी बौद्ध धर्मीयांवर केलेल्या अत्याचाराबाबत हे मौन बाळगतात. कारण अफगाण म्हणजे यांचे लाडके भाई आणि चिनी म्हणजे यांचे भाऊबंद कम्युनिस्ट. मग आपल्याच नातेवाईकांबद्दल ते का बरे बोलतील?

इतिहास सोडा, पण तिबेटमध्ये सध्या काय सुरू आहे? आणि इतके सगळे सुरू असताना इतना सन्नाटा क्यों छाया हैं भाई? इतकी शांतता का आहे? चीनच्या तिबेट स्वायत्त क्षेत्रातील ड्रेगको काऊंटी, कारझे तिबेटी स्वायत्त प्रांतात चिनी अधिकाऱ्यांनी सुमारे ३०० बौद्ध स्तूप आणि भगवान गौतम बुद्ध, गुरू पद्मसंभव आणि खेंपो जिग्मे फुंट्सोक यांचे पुतळे नष्ट केल्याचा दावा करण्यात येत आहे. चिनी फौजांनी मध्यम आकाराच्या शेकडो स्तुपांबरोबरच तीन मोठे स्तूप जमीनदोस्त केले. याशिवाय, त्यांनी सेरथार बौद्ध संस्थेचे संस्थापक आणि पूज्य अभट खेंपो जिग्मे फुंट्सोक यांची नव्याने उभारलेली मूर्ती आणि गुरू पद्मसंभव यांची पवित्र मूर्तीही तोडली. या विध्वंसानंतर, संपूर्ण परिसर सील करून कोणालाही प्रवेश व निर्गमनास परवानगी नाकारण्यात आली. घटनेबाबत बाहेरील जगाशी माहिती शेअर करणाऱ्या व्यक्तींना "राज्यगोपनीयता उल्लंघन"च्या आरोपाखाली तत्काळ अटक केली जात आहे. चिनी अधिकाऱ्यांनी स्तूप "सरकारी जमिनीवर" आणि "नियमांचे उल्लंघन करून" बांधण्यात आले असल्याचे कारण सांगितले आहे. सर्व धार्मिक अवशेष हटवून त्या पवित्र जागेचे अस्तित्वच मिटवले गेले आहे. ही माहिती आपल्याला "तिबेट डॉट नेट"या ऑनलाईन चॅनलवर पाहायला मिळेल. काही भारतीय मीडियाने या बातमीला दुजोरा दिला आहे. मात्र अपवाद वगळता सगळेच चिडिचुप्प आहेत. खरं तर एका प्राचीन संस्कृतीचा हा योजनाबद्ध नाश करण्याचा डाव सुरू आहे.

यापूर्वी २०२१ मध्येही तिबेटमधील ९९ फूट उंच बुद्ध पुतळा नष्ट केल्याचा दावा एका एक्स पोस्टमध्ये केला गेला होता, ज्यामध्ये स्थानिक भिक्खूंना हे पाहण्यास भाग पाडल्याचे म्हटले आहे. या कारवायांना चिनी कम्युनिस्ट पार्टीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक नियंत्रण धोरणांचा भाग मानले जात आहे. या धोरणाचा उद्देश तिबेटी संस्कृती आणि बौद्ध धर्माचा प्रभाव कमी करणे असा आहे. काही अहवालांनुसार, तिबेटमधील बौद्ध भिक्खूंवर कठोर निर्बंध लादले जात आहेत. यामध्ये त्यांच्या धार्मिक प्रथांवर बंदी, मठांवर नियंत्रण आणि काही प्रकरणांमध्ये हिंसाचार किंवा अटक यांचा समावेश आहे. ज्यांनी सरकारच्या धोरणाचा विरोध केला त्यांच्यावर खोटे आरोप लावून अटक केली जात आहे. काही जण बेपत्ता झालेत तर काहींच्या गुप्त हत्येचा संशय आहे. नवीन नियमांनुसार, कोणताही धार्मिक नेता स्वतंत्रपणे धार्मिक क्रिया करू शकत नाही. अनेक मठांमध्ये एका वेळी पाचाहून अधिक भिक्खूंना एकत्र प्रवास करण्यास मनाई आहे, विशेषत: दलाई लामांच्या ९०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने जुलै महिन्यात सार्वजनिक समारंभांवर बंदी होती, अशी माहिती मिळत आहे.

चिनी प्रशासनाने घातलेल्या पूर्ण संप्रेषण बहिष्कारामुळे या घटनांविषयी सखोल माहिती मिळवणे अत्यंत कठीण झाले आहे. ही एक योजनाबद्ध मोहीम आहे, ज्याद्वारे तिबेटी धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मिता नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा करण्यात येत आहे. दोन कट्टर धार्मिक पंथांनी आणि ईश्वर नाकारणाऱ्या कम्युनिस्टांनी जगाचा प्रचंड विध्वंस केला आहे. दोन कट्टर धार्मिक पंथ हा देखील साम्यवादाचा धार्मिक प्रकार आहे. सगळे आमच्यासारखेच हवे, हा अट्टहास आहे. आमचा देवच खरा, आमचा धर्मच खरा. तसेच कम्युनिस्ट म्हणतात आम्हीच खरे. या अट्टहासापोटी जगातल्या अनेक संस्कृती नष्ट झाल्या. आता जगात हिंदू, बौद्ध, ज्यू अशा प्राचीन संस्कृती अस्तित्वात आहेत. या प्राचीन संस्कृतीच्या मुळावर कट्टरतावादी उठले आहेत. तिबेटमधून बुद्ध धम्म नामशेष करण्याचा दाव रचला जात असताना हे छद्म पुरोगामी कोणत्या वाळूत डोके खुपसून बसले आहेत? त्यांनी वाळूतून डोके बाहेर काढावे आणि नेहमीप्रमाणे बेंबीच्या देठापासून बोंबलावे. खरे तर भारतासह इतर देशांनीही विशेषत: बौद्ध देशांनी यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे. कारण शांतीचा संदेश देणारा बुद्ध धम्म टिकला पाहिजे. स्वा. सावरकरांच्या "संन्यस्थ खडग्" या नाटकाच्या संदेशाप्रमाणे सज्जनांनी समरस होऊन "शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्र चिंता प्रवर्तते" हे धोरण आत्मसात करावे लागणार आहे.

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# ऐतिहासिक किल्ल्यांचे संवर्धन आवश्यक

आपली ऐतिहासिक धरोहर असलेल्या वास्तू, गड, किल्ल्यांचे संवर्धन, संरक्षण झाले पाहिजे, असे आपण म्हणतो. पण, प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. या कामाकडे लक्ष देण्यासाठी सरकारने पुरातत्त्व विभागाची निर्मिती केली होती. पण, या विभागाचे गड, किल्ल्यांच्या देखभाल, दुरुस्तीकडे हवे तेवढे लक्ष नसल्यासे दिसून येते. हे आठवण्याचे कारण म्हणजे गुरुवारी बाळापूर येथील मन आणि महिषी या नद्यांच्या संगमावर असलेल्या एका बेटासारख्या भूभागावर असलेल्या पुरातन किल्ल्याचा बुरुज ढासळला. अनेक वर्षांपासून हा किल्ला शिकस्त झाला आहे. पुरातत्त्व विभागाने या किल्ल्याची थोडीफार डागडुजी केली होती. त्यानंतर मात्र त्याकडे या विभागाने फारसे लक्ष दिले नसल्याने हा बुरुज ढासळल्याची सर्वत्र चर्चा आहे.

खरे म्हणजे पुरातत्त्व विभागाने अशा गड, किल्ल्यांची नियमित पाहणी करणे, त्याची डागडुजी करणे, शिकस्त झालेल्या किल्ल्यांच्या आसपास वास्तव्यास असलेल्या नागरिकांना संभाव्य धोक्याची सूचना देणे इत्यादी कामे करणे अपेक्षितच आहेत. असे गड, किल्ले व ऐतिहासिक वास्तू अकोला, बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात म्हणजे वऱ्हाडत आहेत. मात्र, पुरातत्त्व विभागाचे याकडे कितपत लक्ष आहे ते त्यांनाच ठावूक. खामगाव येथे शिवाजी वेस आहे. पूर्वीच्या काळी असलेल्या खामगावला परकोट होता. त्याला दोन प्रवेशद्वार होते. त्याला आता शिवाजी वेस, असे नाव देण्यात आले आहे. या ऐतिहासिक प्रवेशद्वारांची देखभाल व दुरुस्ती पुरातत्त्व विभागाने करणे अपेक्षित आहे. खामगाव तालुक्यात गोंधनापूर येथे नागपूरच्या भोसलेंच्या चिटणीसांनी बांधलेला किल्ला आहे. अकोला येथे असगढ नावा किल्ला आहे. त्याची देखील आज दुरवस्था झाली आहे. या किल्ल्याला परकोट होता. त्याला दहीहांडा वेस, बाळापूर वेस, अगरवेस आणि गंजवेस असे चार प्रवेशद्वार होते. किल्ल्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने तीन बुरुज होते. त्यांना गंज बुरुज, अगरवेस बुरुज आणि असद बुरुज असे म्हटले जात होते. सध्या हा किल्ला पूर्णत: ध्वस्त झाला आहे. किल्ल्यापासून काही अंतररावर अगरवेस आहे. त्यातून लोक येणे जाणे करतात. अकोला नगर परिषदेने या किल्ल्यावर हुतात्म्यांचे स्मारक उभारून बगीचा तयार केला होता. त्याला आझाद पार्क, असे नाव देण्यात आले. पण, आज या हुतात्मा स्मारकाची निगा राखली जात नाही. या परिसरात वास्तव्यास असलेले लोक किंवा शहरातील काही उपद्रवखोर या बगिच्याचा उपयोग अवैध धंद्यासाठी करतात. अशीच स्थिती अकोट तालुक्यातील नरनाळा किल्ल्याची आहे. वाशीम येथील माहूर वेस, कारंज लाड येथील वेस, मेहकर येथील कंचनीचा महाल, लोणार येथील खाऱ्या पाण्याच्या सरोवराशिवाय असलेली हेमाडपंथी मंदिरे, अन्नछत्रालय या ऐतिहासिक व पुरातन वास्तूंकडे लक्ष देण्याची गरज आहे. या किल्ल्यांचे देखील जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे राजस्थान सरकारने ऐतिहासिक गड, किल्ल्यांचे जतन, संवर्धन केले, त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार देखील करू शकते. तेव्हा, पुरातत्त्व विभागाने याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. या ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक व अभ्यासक येथे येतात. भारतातील स्थापत्य कला किती प्रगत होती हे या वास्तूंवर दिसून येते. वेरूळ व अजिंठा लेणींचे ज्याप्रमाणे आपण राष्ट्रीय धरोहर म्हणून जतन केले त्याचप्रमाणे वऱ्हाडातील या ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकविताना नव्या पिढीला आपण त्यांनी बांधलेल्या गड, किल्ल्यांविषयी सांगतो. पण, किल्ला कसा असतो, हे त्या चिमुकल्याने विचारल्यावर आपण निरुत्तर होतो. त्यांना दाखविण्यासाठी आपल्या परिसरात किल्ले असूनही आपण त्यांना तेथे नेऊन ते दाखवू शकत नाही. बाळापूरच्या किल्ल्याचा बुरुज ढासळल्यावर अकोल्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी राज्याच्या पर्यटन मंत्रालयाशी संपर्क साधून किल्ला परिसरातीलच श्री बालादेवी मंदिर परिसरातील पडलेली भिंत बांधण्याबाबत योग्य दखल घेण्यास संबंधितांना सांगितले. तर, खासदार अनुप धोत्रे यांनी देखील केंद्रीय पर्यटन मंत्रालयाशी संपर्क साधून किल्ल्याचा बुरुज ढासळल्याची माहिती दिली. तसेच, पुरातत्त्व विभागाने वऱ्हाडच नव्हे तर, महाराष्ट्रातील अशा लहान शहर, गावातील पुरातन वास्तू, गड, किल्ल्यांची माहिती घेऊन त्यांची देखभाल व दुरुस्ती तातडीने करावी. त्यासाठी त्यांच्याकडे निधी नसल्यास त्याबाबतचे निदान प्रस्ताव तरी शासनाकडे पाठवावे. कारण, या ऐतिहासिक वास्तूंमुळे आपल्याला प्रेरणा मिळून राष्ट्राभिमान व राष्ट्रभक्ती चेतविण्यास मदत होते. अकोल्याच्या पालकमंत्र्यांनी देखील याचा पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करावीशी वाटते.

८८०६००६१४९

---

## प्रासंगिक

**कर्नल अभय बाळकृष्ण पटवर्धन (निवृत्त)**

# कारगिल युद्धातील पहिला हुतात्मा

शनिवार, २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस आहे. त्या युद्धात, ओठावरचे दूधही न वाळलेला, नीट मिसरूडही न फुटलेला एक तरुण सेनाधिकारी आणि त्याच्या बरोबरचे पाच सैनिक युद्ध सुरू होण्याआधीच पाकिस्तानच्या कुटिल कारस्थानाला बळी पडले. चक्रव्यूहात अडकलेल्या महाभारतातील अभिमन्यूसारखीच त्या सर्वांची अवस्था झाली, ते चक्रव्यूहात तर गेलेत पण जिवंत बाहेर पडू शकले नाहीत त्याची ही आँखोदेखी कहाणी सर्व कारगिल योद्ध्यांना अर्पण.

कारगिल युद्ध सुरू व्हायच्या २० दिवस आधी, कारगिल पर्वतराजींवर आपल्या मेंढ्या चरायला घेऊन गेलेले मेंढपाळ खाली उतरत असताना त्यांना तेथे काही माणसे पठाणी वेषात दिसली. यावेळी, याठिकाणी ही माणसे कशी ही शंका आलेल्या त्या मेंढपाळांनी ही गोष्ट खाली उतरल्यावर असलेल्या पोस्ट कमांडरच्या कानी घातली. यथावकाश ती स्थानिक सैनिकी मुख्यालयापर्यंत पोहोचली. ही बातमी मिळाल्यावर तेथे झालेल्या तथाकथित पाक सैनिकी घुसखोरीची शहानिशा करण्यासाठी गेलेले, माझ्या जाट रेजिमेंटचे कॅप्टन सौरभ कालिया हे कारगिल युद्धातील पहिले हुतात्मा होते. घुसखोरीची माहिती मिळाल्यावर त्यांना या बातमीची शहानिशा करण्यासाठी पाठवण्यात आले. त्यानुसार, जेमतेम तेरा चौदा महिन्यांची सर्व्हिस झालेले कॅप्टन सौरभ कालिया आपल्या पाच साथीदारांसह बजरंग पोस्टवर गेले.

१९७३ मधील शस्त्रसंधीनंतर मागील २६ वर्ष त्या क्षेत्रात अशी पाक सैनिकी घुसखोरीची घटना कधीही झाली नव्हती. पण आता; पूर्व पाकिस्तानमधील लाजिरवाण्या पराभवचे भळभळणारे शल्य शमवण्यासाठी सदैव धडपड करणारे जनरल परवेझ मुशर्रफ, पाक आर्मी चीफ झाले होते. त्यांनीच या ऑपरेशनची आखणी करून ते राबवले. पण भारतीय सेनेला याची कल्पना नसल्यामुळे, कॅप्टन सौरभच्या लीडरशिपमधे पाठवण्यात आलेल हे एक रूटीन पेट्रोल होत. जेमतेम एक वर्षाची सर्व्हिस झालेल्या सौरभला परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव होऊ शकली/झाली नाही. ते सर्व बजरंग पोस्टवर पोहोचल्यावर तेथे लपून बसलेल्या पाक सैनिकांनी, आश्चर्यचकित झालेल्या या असावध पेट्रोलला त्वरित घेरा घालून पकडले आणि पुढील २० दिवस ओलिस ठेवले. त्यानंतर त्यांच्या साथीदारांसारखेच विद्रूप झालेले त्यांचे कलेवर भारतीय सेनेच्या ताब्यात देण्यात आले. हे पाकिस्तानी सेनेची अश्लाघ्य क्रूर मनोवृत्ती आणि अत्यंत चिथावणीखोर कृती उजागर करणारे, जिनेव्हा करारानुसार युद्ध गुन्हा असलेले, एक लाजिरवाणे कृत्य होते.



कॅप्टन सौरभ कालियाचा जन्म पालमपूर, कांगडा येथील डॉ. एन. के. कालिया यांच्या घरी झाला होता. त्यांना डिसेंबर १९९८ मध्ये ४ जाट रेजिमेंटमधे नियुक्ती (कमिशन) मिळाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच कारगिलमधे पोस्टिंग मिळाली. काकसर परिसरात घुसखोरीची माहिती घेण्यासाठी त्यांच्या पेट्रोलला, १४,००० फूट उंचीवरील बजरंग पोस्टवर पाठवण्यात आले. परत देण्यात आलेल्या सर्व कलेवरांच्या अंगावर विकृत छळाच्या निर्घृण खुणा होत्या. सर्व कलेवर सिगारेटच्या चटक्यांनी भरली होती. त्यांची जीभ हासडून, डोळे काढून, गुप्तांग कापून, त्यांच्या बॉडी बॅगमधे भरण्यात आली होती. मानवी बर्बरतेचा हा शहारे आणणारा भयानक नमुना होता. सौरभ माझ्याच रेजिमेंटचा असल्यामुळे मी त्याच्या कुटुंबाला भेटून सांत्वन करू शकलो. त्यांच्याशी संवाद साधताना साहजिकपणे डोळे पाणावले होते. त्यांच्यानुसार कारगिल विजय दिवस; देशाचे खरे हिरो असणारे सैनिक आणि अधिकाऱ्यांचे शौर्य, धैर्य आणि बलिदानाबद्दल अभिमानाचा आहे. आपल्या प्राणांची पर्वा न करता, प्रसंगी आपली आहुती देऊन त्यांनी या क्षेत्रातील सर्व उंच चौक्यांवर पुन्हा नियंत्रण मिळवले होते. प्रचंड उंच पर्वत आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लढलेल्या सर्वांत कठीण लढायांमधील शौर्याबद्दल भारतीय सेनेचे अभिनंदन, कौतुक आणि जयघोष करावा तेवढा कमीच आहे. या हुतात्म्यांना अभिवादन करताना त्यात माझा शूर मुलगा सौरभ होता याचा मला अभिमानही आहे आणि तो गेल्याचे दुख:ही. ही एक संमिश्र भावना आहे. सौरभच्या आईने त्याच्या खूप प्रेमळ आणि हृदयस्पर्शी आठवणी आपल्या मनात साठवून ठेवल्या आहेत. त्यांच्यानुसार सौरभ; एक शांत, अदम्य आत्मा आणि लक्ष केंद्रित, देशभक्तीच्या भावनेने परिपूर्ण व्यक्तिमत्त्व होते. तो त्याच्या २१ व्या वर्षी, लष्करी कारकीर्दीच्या अगदी सुरुवातीलाच हुतात्मा झाला याचे त्यांना वाईट वाटते पण, एका खऱ्या सैनिकाप्रमाणे त्याने देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचा त्यांना (व मलाही) खूप अभिमान आहे. त्या पुढे म्हणतात, ३० एप्रिलला कॅप्टन सौरभ कालियाने त्याचा धाकटा भाऊ वैभव कालियाला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी फोन केला. ती त्याची शेवटची आठवण आहे. त्याच वेळी मी ३० जूनला माझ्या वाढदिवसासाठी घरी येईन असेही त्याने सांगितले होते. तो घरी आला, पण राष्ट्रीय तिरंग्यात गुंडाळलेल्या अवस्थेत. पाकिस्तानी सेनेने सौरभ व त्याच्या साथीदारांना दिलेली वागणूक अमानवी, चिथावणीखोर आणि अन्यायी होती. त्यांना कैदेत असताना जी अश्लाघ्य, सैतानी वागणूक आणि क्रूर छळ सहन करावा त्याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. या सहा शूर जाट सैनिकांवर झालेल्या शारीरिक व मानसिक अत्याचाराची माहिती, त्यांचे मृतदेह भारतीय सेनेला सोपवण्यात आल्यावरच जगजाहीर झाली. या राक्षसी मनोवृत्तीनी संपूर्ण देश हादरला आणि जगाला पाकिस्तानचे खरे पाशवी स्वरूप कळले. या पेट्रोलमुळेच आपण खाली केलेल्या शिखरांवर झालेला पाक सेनेचा कब्जा, त्यांची या क्षेत्रात सर्वत्र झालेली बेकायदेशीर घुसखोरी आणि कारगिल, द्रास आणि बटालिक सेक्टरच्या उंच शिखरांवरील त्यांचे नियंत्रण खरोखर समजले नसते.

सौरभ कालियावर झालेल्या छळाचे वर्णन खरोखरच हृदयाला भिडणारे आहे. त्याच्या माता-पित्यानुसार त्या अमानुष छळाची तीव्रता आणि व्याप्ती किती असेल याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. त्यांना जे सहन करावे लागले त्याच्या तुलनेत मुलाला दुरावण्याच त्यांचे दु:ख काहीच नाही. त्या दोघांनाही वाईट वाटते की ज्याप्रमाणे राजकीय व आंतरराष्ट्रीय दबाव टाकून सांप्रत सरकारने पाक कैदेतून ४८ तासांत, विंग कमांडर अभिनंदन वर्धमानची सुरक्षित सुटका केली तसा दबाव तत्कालीन सरकार टाकू/आणू शकले नाही.

सौरभच्या वडिलांनुसार, देशाचे रक्षण करताना आपले प्राण अर्पण करणाऱ्यांना, कारगिलमधील हुतात्म्यांना आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांशी लढणाऱ्या जवानांना योग्य तो आदर देणे आणि त्यांच्या कुटुंबीयांची काळजी घेणे हे सरकार व समाजाचे कर्तव्य आहे. सैनिकांना फक्त आर्थिक भरपाई, सेवा देयक किंवा इतर लाभांची नाही तर सन्माननीय जीवनाची आवश्यकता आहे. सरकार व समाजाने त्यांना सर्वोत्तम दिले पाहिजे. सौरभ कालियाच्या आई-वडिलांचे सांत्वन करण्यासाठी माझी भावना व शब्द अपुरे होते.


देशासाठी प्राणार्पण करणारा प्रत्येक भारतीय सैनिक सर्वोच्च त्याग करून अमर होतो. असे असाधारण लोक, देशसेवेसाठी जन्माला येतात, इतिहास लिहितात. कॅप्टन सौरभ कालियासारखे वीर, कायम जिवंत असतात/राहतात. भूतपूर्व सैनिक म्हणून मी, काही वर्षांनी या जगात नसेन. पण प्रत्येक हुतात्मा सैनिक अमरच राहील/असेल. काश्मीरमध्ये असो किंवा इतर कुठेही; युद्धात मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक सैनिकाबद्दल जनमनात हीच भावना जोपासली जाणे आवश्यक आहे. जय हिंद.

९४२२१४९८७६

---

### डीजे की ध्वनिप्रदूषण?

नुकतीच शयनी एकादशी झाली. कालपासून श्रावण महिन्याची सुरुवात झाली आहे. हे चार महिने सण-उत्सवांचे, आनंदाचे आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण करणारे असतात. मात्र या मंगल प्रसंगात डोकेदुखी ठरते ती वाढत्या ध्वनिप्रदूषणाची. विशेषत: गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजेच्या आवाजाची.



डीजे म्हणजे डिस्क जॉकी. संगीतप्रेमींसाठी मधुर संगीत सादर करणारी व्यक्ती. पण आज डीजे म्हणजे अत्यंत कर्कश, १२० डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारा त्रासदायक प्रकार बनला आहे. सामान्य आवाजाची मर्यादा ५० डेसिबल असते. त्याहून अधिक ध्वनी माणसाच्या मेंदूवर, हृदयावर आणि श्रवणशक्तीवर परिणाम करतो. गर्भवती महिला, नवजात बाळ, वृद्ध नागरिक, तसेच हृदयविकार-रक्तदाबाचे रुग्ण यांच्यासाठी हा आवाज घातक ठरू शकतो. ध्वनिप्रदूषण कायद्यानुसार निवासी भागात ध्वनी मर्यादा ३० डेसिबल असावी, तर रुग्णालय, न्यायालय, शाळांसारख्या शांततेच्या झोनमध्ये ध्वनिक्षेपक निषिद्ध आहे. आपण सुजाण नागरिक आहोत. आपल्या आनंदामुळे इतरांना दु:ख होणार नाही याची काळजी घेणे हीच खरी संस्कृती. त्यामुळे गणेशोत्सवात भजन, कीर्तन, आरती यांच्या मधुर स्वरांनी वातावरण आनंदी करूया आणि कर्णकर्कश डीजेच्या आवाजातून निर्माण होणाऱ्या संकटांना दूर ठेवूया.

**अरुण कराळे**/१०९६३२६२७२

●● ●●

### महाराष्ट्रातील शैक्षणिक पद्धतीचा प्रचार का होत नाही?

अलिकडे बहुचर्चित असलेला मल्याळम भाषेतील चित्रपट '८' (एट) हा तेथील शैक्षणिक पद्धतीत झालेला आमूलाग्र बदल खरंच मोठा आहे हा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. बॅकबेंचर ही संकल्पनाच मोडीत काढण्याचा एक प्रयत्न केला. विद्यार्थी जीवनात मुलांच्या मनात ते कोरले जाते की, मी बॅकबेंचर आहे. असा विद्यार्थी कधीच पुढे येण्याचे साहस करीत नाही. आणि तो कायमचा बॅकबेंचर होऊन जातो. अगदी अलिकडे होणाऱ्या गेट-टुगेदरच्या पार्टीत सुद्धा अमुक विद्यार्थी .... तमुक विद्यार्थी तो नाही का... बॅकबेंचर या नावाने त्याला ओळखले जाते.

मी महाराष्ट्रातील भंडारा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका आहे. आज जे चित्रपट '८' मध्ये वर्ग रचना दाखवली जात आहे, त्याचे मोठे कौतुक केले जात आहे आणि ते खरंच कौतुकास्पद देखील आहे. कारण प्रत्येक विद्यार्थ्याला मी समोर बसलो आहे आणि फेस टु फेस शिक्षण प्रक्रिया घडत आहे, ही विद्यार्थ्यांच्या मनावर कोरणारी फार मोलाची गोष्ट आहे. मला फक्त एवढंच म्हणायचं आहे की, जेव्हा महाराष्ट्रात सर्व शिक्षा अभियान सुरू झाले आणि आणि आम्हा जिल्हा परिषद शाळेचे रुपडे पालटले. आमच्याकडे षटकोनी वर्गखोल्यांचे बांधकाम सुरू झाले. अतिशय सुंदर, भरपूर प्रकाश, हवा खेळती राहील अशीच ती वर्गखोली होती आणि आहे. त्या प्रत्येक शाळेत जिथे षटकोनी वर्गखोल्या आहेत तिथे अगदी २००७ च्या काळापासून तर आजतागायत वर्तुळाकार बसवून अध्यापन केलं जातं. आपल्या महाराष्ट्रात सर्वांत प्रथम षटकोन इमारतीमध्ये अशी वर्गरचना केली आणि बॅकबेंच ही संकल्पना बहुतांश त्याच कालावधीत नष्ट झाली. त्यानंतर आनंददायी शिक्षण आले आणि विद्यार्थी शिक्षकाच्या भोवताली शैक्षणिक साहित्यासह बसलेले दिसायचे. मला फक्त हेच मनापासून वाटते की, माझा महाराष्ट्र शैक्षणिक प्रयोगात प्रगतीत कुठेच कमी नाही. आज जे दाखवले ते माझ्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेमध्ये २००९ पासूनच सुरू होते. फक्त त्याचा पाहिजे तेवढा प्रचार अन् प्रसार झाला नसल्याने आम्ही राबविलेला प्रयोग जगासमोर आला नाही.

**वर्षा बढिये**/९८३४२३७६१८

●● ●●

## वाचक पत्रे

### पोलिसांचे रामचरित मानस पठन

मध्यप्रदेश पोलिसांच्या प्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक राजाबाबू सिंह यांनी एक अद्‌भुत उपक्रम राबविणार असल्याची घोषणा केली आहे. मर्यादापुरुषोत्तम, आदर्श राजा प्रभू श्रीराम यांची चौदा वर्षे वनवासात गेली. या वर्षात ते घरी परतले नव्हते. सर्व सुखसोयींपासून लांब राहून त्यांनी जीवन व्यतीत केले. केव्हा कोणत्या संकटाचा सामना करावा लागेल याचा भरवसा नव्हता. तेव्हा त्या संकटांना कसे तोंड द्यावे याचा परिपाठ त्यांनी घालून दिला. आज कितीतरी हजार वर्ष झालीत तरी रामायण हे आपल्यासाठी आदर्श आहे.

हे सांगण्याचे औचित्य असे की मध्यप्रदेश पोलिस खात्याकडून पोलिस विभागात नव्याने निवड झालेल्या चार हजार कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण या आठवड्यात सुरू होणार आहे. त्यापैकी ३०० कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घराजवळच्या केंद्रात व्हावे असे अर्ज दाखल केले आहेत. पण त्यांची ही मानसिकता पोलिस दलासाठी उपयोगी नाही असे त्यांचे मत आहे. त्यामुळे या मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी त्यांनी एक उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. ते म्हणजे दररोज रात्री रामचरितमानस वाचनाचा नियम करणे. याने प्रशिक्षणार्थींना बळ आणि धैर्य मिळेल ही उदात्त भावना आहे. या उपक्रमाला अनेक शुभेच्छा आणि मध्यप्रदेश पोलिस खात्याच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पोलिस दलाच्यावतीने बालकांचा हक्क व सुरक्षा कार्यशाळा

## शाळांमधील मुख्याध्यापक, स्कुल व्हॅनचालक यांची उपस्थिती




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
येथील कै शिवाजीराव देशमुख सभागृहात शनिवारी पोलिस दलाच्यावतीने बालकांचा हक्क व सुरक्षा या संदर्भात जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.
यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, दिशा फाऊंडेशनचे मार्गदर्शक प्रवीण खांडपासोळे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जिल्हा विशेष शाखचे पोलिस निरीक्षक बद्रीनाथ सानप, वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक मरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बानापूरे यांची प्रमुख उपस्थिती होती.
शाळांमध्ये ग्रामीण भागातून तसेच शहरातून विविध वाहनांनी येणाऱ्या बालकांच्या सुरक्षा व हक्क याविषणी प्रवीण खांडपासोळे यांनी मार्गदर्शन करतांना विविध उदाहरणे देत विद्यार्थी आणि पालकांना त्यांच्या पाल्याबाबत कसे सतर्क आणि सुरक्षित राहता येईल याबाबत सांगितले.
आपला मुलगा, मुलगी ज्या वाहनात जातो त्या वाहन चालकांचे चारित्र्य तसेच त्यांच्याकडे असलेले परवाने याबाबत खातरजमा करून घेणे आवश्यक आहे. शाळांनीही वाहन चालकांच्या परवाना, मोबाईल क्रमांक तसेच इतर बाबतीत माहीती ठेवणे आवश्यक आहे. शाळेत वेळेवर मुले पोहोचतात की नाही, घरी वेळेवर येतात की नाही याची खातरजमा पालकांनी करावी.
प्रत्येक वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करावे. क्षमतेपेक्षा जास्त मुलांना वाहनात बसवू नये. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता अधिक मजबुत होणार आहे. यासाठी शाळा आणि पालकांनी याबाबत सतर्क असले पाहीजे.
यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, प्रतिनिधी आणि शाळा वाहन चालक यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करू नये अशा स्पष्ट सूचना दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार डॉ विजय निलावार यांनी केले. यावेळी शाळांचे मुख्याध्यापक, प्रतिनिधी तसेच शाळा वाहन चालक यांची उपस्थिती होती.

# तांदुळाचा पुरवठा होत नसल्यामुळे पोषण आहार बंदच

## पुरवठादारास गुंड प्रवृत्ती लोकांचा त्रास

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
जिल्ह्यातील शाळांमधून शालेय पोषण आहार योजनेचा तांदुळ आणि धान्यादी साहित्याचा पुरवठाच नसल्यामुळे सुमारे ८८० शाळांमधून खिचडी शिजवणे बंद झाले आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांना आहार बंद झाल्यामुळे उपासमारीची वेळ आली असून पुरवठादाराला काही गुंड धमक्या देत असल्यामुळे त्याने पुरवठा करण्यास असमर्थता दर्शवली आहे.
हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि खाजगी अनुदानीत शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजन दिले जाते. सुमारे ८८० शाळांमधून १ लाख ७२ हजार विद्यार्थी याचा लाभ घेतात. कंत्राटदार पुरवठादाराकडून शाळेला तांदुळासह डाळी, मटकी, तेल तसेच मोहरी, मिरची, जिरे या मसाल्याच्या पदार्थाचा पुरवठा केल्या जातो. शाळेत विद्यार्थी संख्येनुसार लागणारे धान्य दिले जाते. मात्र जिल्ह्यात एक ते दीड महिन्यापासून तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठाच झाला नाही. काही शाळांनी मे महिन्यात शिल्लक असलेला तांदुळ काही दिवस वापरला मात्र त्यानंतर या शाळांमधूनच तांदुळ संपला आहे. शाळांमधुन धान्य व मसाल्याचे पदार्थ संपल्यामुळे शाळा प्रशासनाने गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने वरिष्ठ कार्यालयाकडे मागणी नोंदवली आहे. परंतु अद्यापही तांदुळाचा पुरवठा शाळांना झाला नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन मिळत नाही. गोरगरीब विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.
याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवरही होत असल्याचे दिसत आहे. खिचडी का शिजत नाही याची विचारणा पालकांसोबतच विद्यार्थ्यांकडूनही होत आहे.
यासंदर्भात माहीती घेतली असता काही गुंड प्रवृत्तीचे लोक पुरवठादारास धमकावत असल्याचे पत्र पुरवठादाराने शिक्षण विभागाला दिले आहे. परंतु या गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी अजूनही शिक्षण विभागाला यश आले नसल्याचे दिसत आहेत. तक्रारीत नावे नसल्यामुळे नेमके ते गुंड प्रवृत्तीचे लोक कोण आहेत? त्यांना विद्यार्थ्यांचा शालेय पोषण आहारही आता कमी पडत आहे का? पुरवठादार कोणाच्या दबावात काम करीत आहे? याबाबत शिक्षण विभागही मूग गिळून का गप्प आहे? यामागे राजकीय पुढाऱ्याचा हात आहे का? पुरवठादाराने शिक्षण विभागाऐवजी पोलिसांकडे तक्रार का दिली नाही? आदी प्रश्न आता उपस्थित होत असून गोरगरीब विद्यार्थ्यांना मागील एक ते दीड महिन्यांपासून शाळेमध्ये शालेय पोषण आहार मिळाला नाही यास जबाबदार कोण आहेत? त्यांच्यावर काय कार्यवाही होणार? असे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरीत असून ग्रामीण भागातून शहरात शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील एक ते दीड महिन्यापासून शाळेत खिचडी मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या समस्यांचे निराकरण तत्काळ करावे अशी मागणी पालक आणि विद्यार्थ्यांमधून होत असून याबाबत प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हिंगोली जिल्ह्यात दोन दिवसांपासून संततधार पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
जिल्ह्यात दोन दिवसांपासून संततधार पाऊस पडत असल्यामुळे नदी, नाले, ओढे तसेच धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली असून शेतकरी वर्ग सुखावला आहे. दुसरीडे या पावसामुळे शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामाचा दर्जाही समोर आला आहे.
यावर्षी जून आणि जुलै महिन्याच्या सुरूवातीला काही प्रमाणात पाऊस पडला परंतु शेतकऱ्यांनी खरीपाची पेरणी केल्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत होते. जुलै महिना संपत असतांना जिल्ह्यात पावसाने जोरदार पुनरागमन केल आहे. मागील तीन ते चार दिवसांपासून जिल्ह्यात विविध ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस झाल्यामुळ माना टाकलेल्या पिकांना जीवदान मिळाले आहे. शुक्रवार आणि शनिवार या दोन दिवशी जिल्ह्यात सर्वच तालुका आणि मंडळात संततधार पाऊस पडत आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील नदी, नाले, ओढे दुथडी भरून वाहत असून पावसाने जोरदार पुनरागमन केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील धरणांच्या पाणी पातळीतही या पावसामुळे वाढ झाल्याचे दिसत आहे. येलदरी धरणात ६७.१२ टक्के, सिध्देश्वर धरणात ४०.७० टक्के, इसापूर धरणात ६७.२५ टक्के इतका पाणीसाठा झाला आहे.
यावर्षी कयाधू नदीला जुलै महिन्यात झालेल्या पावसामुळे पाणी आले असून शनिवारी कयाधू नदी दुथडी भरून वाहत असताना दिसत होती.
दुसरीकडे संततधार पावसामुळे शहरातील रिसाला बाजार, गणेशवाडी, गंगा नगर, अंतुले नगर, सुराणा नगर आदी भागातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे या रस्त्यावरून वाहनचालवतांना जीव मुठीत धरून वाहने चालवावी लागत आहेत तर खटकाळी बायपासकडे जाणाऱ्या नवीन रेल्वे उड्डाण पूलावर जागोजागील पाणी साचत असल्यामुळे या पुलावरून प्रवास करीत असतांना नागरिकांसह वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसामुळे शहरातील व्यापारपेठेवरही परिणाम झाला असून संततधार पावसामुळे बाजारपेठेत शुकशुकाट दिसत आहे. ग्रामीण भागात शेतकरी आता कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे. पावसामुळे शहरातील जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले असले तरी समाधानकारक पाऊस पडल्यामुळे आनंदही व्यक्त होत आहे.


**हिंगोली– जून महिना उलटूनही शहरातील कयाधू नदीचे पात्र कोरडेठाक पडले होते परंतु मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यात संततधार पाऊस पडत असल्यामुळे येथील कयाधू नदी दुथडी भरून वाहत असतांना दिसत आहे. नदीला पाणी आल्यामुळे जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### वसमत आयटीआयमध्ये विजय दिन साजरा

हिंगोली– कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून वसमत आयटीआयमध्ये दि. २४ जुलै, २०२५ रोजी विजय दिवस साजरा करण्यात आला. या विजय दिवसाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे प्राचार्य एस. एल. कोंडावार हे होते, विजय दिवसानिमित्त मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ता म्हणून प्रा.डॉ.शशिकांत तोळमारे यांना आमंत्रित करण्यात आलेले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआयमधील आयएमसीचे सदस्य राजेश भालेराव, सुजित आंबेकर व शंतनु देशपांडे हे उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा. तोळमारे यांनी उपस्थितांना कारगील युद्धाबद्दल माहिती देऊन विजय दिवसाचे महत्त्व सांगितले. तसेच संस्थेचे प्राचार्य एस. एल. कोंडावार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना विजय दिवसाचे महत्त्व सांगितले, तसेच संस्थेतील गटनिदेशक टी. जे. झाड, शिल्प निदेशक गणेश येमवार, आर. एन. कानगुले, एन.एस. सबनवार, पी.व्ही वानखडे, एस. आर. पडघन, मुख्य लिपिक एस.आर खूपसे, वरिष्ठ लिपिक श्रीमती आर.जे शहारे व कार्यालयीन कर्मचारी डी. व्ही साळवे, एन. एच वाहेवळ यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

### एचआयव्ही विषयक कार्यशाळा संपन्न



हिंगोली– जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयातील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षामार्फत डापकू सभागृहात जिल्ह्यातील रेड रिबन क्लब महाविद्यालयातील सर्व नोडल अधिकारी व पिअर एज्युकेटर यांची एचआयव्ही/एड्स विषयी आज कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी. एस. चौधरी यांनी एचआयव्हीला हद्दपार करण्यासाठी युवकांची भूमिका सर्वात महत्वाची असल्याने त्यांना एचआयव्ही/एड्स याविषयी माहिती असणे किती गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. तसेच रेड रिबन क्लब अंतर्गत महाविद्यालय स्तरावर वर्षभर घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी संजय पवार, श्रीमती टीना कुंदणानी व आशिष पाटील यांनी परिश्रम घेतले.

### दोन जुगार अड्ड्यावर धाडी

हिंगोली– जुगार कायद्यांतर्गत जिल्ह्यात पोलिसांनी दोन ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाडी टाकल्या असून त्याठिकाणाहून सुमारे ३ लाख ३८ हजार ७६५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध वाहतुक करणारे व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३१ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही करीत २८२५० रूपयांचा दंड वसुल केला आहे.

# भरपावसात आ. राजू नवघरेंनी केली विकास कामांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २६ जुलै**
भरपावसात आ. राजू नवघरे यांनी शुक्रवारी शहरातील प्रभाग क्रमांक १२ मधील झालेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे.
आमदार राजू नवघरे यांच्या सतत पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नांमुळे शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये सामाजिक उपयोगासाठी आवश्यक असलेल्या सभागृह, हॉल व मंडपांची कामे पूर्ण झाली आहेत. मयूर नगर येथे उभारण्यात आलेल्या सभागृहाचे काम पूर्ण झाले असून, आता येथील नागरिकांना विवाह, सांस्कृतिक कार्यक्रम, बैठका यासाठी स्वतंत्र आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध झाली आहे.
स्नेह नगर येथील योगा हॉलचे कामही पूर्ण झाले असून, आरोग्यप्रेमी नागरिकांना सकाळी आणि संध्याकाळी योगाभ्यास करण्यासाठी हॉल उपलब्ध झाला आहे. बालाजी नगर मधील श्री बालाजी मंदिर परिसरातील सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. धार्मिक कार्यक्रम, सण-उत्सव यावेळी नागरिकांना आता या जागेचा भरपूर उपयोग होणार आहे.
आर्य वैश समाज मंडळासाठी उभारण्यात आलेल्या सभा मंडपाचे कामही पूर्ण झाले असून, समाजबांधवांना आता सामूहिक कार्यक्रमांसाठी सुंदर, प्रशस्त आणि आधुनिक सभागृह मिळाले आहे. या सर्व विकासकामांमागे आ राजू नवघरे यांचा पुढाकार, निधीसाठी केलेला पाठपुरावा आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्याने वेळेवर कामे पूर्ण करण्याचा ध्यास आहे. यामुळे शहरातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यांना चालना मिळाली आहे.
भर पावसात जाऊन पाहणी करणाऱ्या आ नवघरे यांचे नागरिकांनी विशेष कौतुक केले. अनेकांनी थेट संवाद साधून आपल्या अडचणी मांडल्या त्यावर आमदारांनी त्वरित प्रतिसाद देत संबंधित विभागांना निर्देश दिले. शहरातील प्रत्येक वॉर्ड, प्रत्येक समाज, प्रत्येक नागरिकासाठी उपयुक्त अशी सुविधा निर्माण करणे हेच माझे ध्येय आहे, आमदार राजू भैय्या नवघरे यांनी सांगितले

# शिरड शहापूरच्या उपसरपंचपदी पुष्पा स्वामी




**तभा वृत्तसेवा**
**शिरड शहापूर, २६ जुलै**
औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर या मोठ्या ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पुष्पा शिवहार स्वामी यांची निवड झाली आहे.
शिरड शहापूर ही औंढा तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतीपैकी एक ग्रामपंचायत आहे. या गावात सर्व जातीधर्माचे लोक राहतात. राजकीय दृष्टीकोनातून या गावाचे वसमत विधानसभा मतदारसंघात मोठे महत्व आहे. या ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची नुकतीच निवड सर्वानुमते करण्यात आली. उपसरपंचपदी सौ. पुष्पा शिवहार स्वामी यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी वसमतचे राष्ट्रवादीचे आ. राजू नवघरे यांनी उपसरपंच पुष्पा स्वामी यांचा सत्कार केला. यावेळी माजी जि प उपाध्यक्ष मिलींद यंबल, सरपंच जितू रावले, ग्राम विकास अधिकारी गंगाधर हलबुर्गे, बाळूमामा ढोरे, युवक जिल्हाध्यक्ष आदीत्य आहेर आदींची उपस्थिती होती.

# शेख खलील बेलदार यांचा एमआयएममध्ये जाहीर प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
छत्रपती संभाजी नगर येथील प्रदेश कार्यालयात पक्ष प्रवेश केला समाजवादी पक्षाचे नेते शेख खलील बेलदार यांनी प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वात जाहीर प्रवेश केला आहे.
यावेळी हाजी अब्दुल खुद्दस, सय्यद साबेर नांदापूरकर, पठाण इम्रान खान, इरफान पठाण, मुद्दस्सर शेख कौसर, शेख समीर, शेख आयुब, पठाण नजीब खान व इतर उपस्थित होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार असदुद्दीन ओवेसी व माजी खा. इम्तियाज जलील तसेच पक्षाचे नेते समीर साजिद यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सदरील प्रवेश झाला असल्याचे शेख खलील बेलदार यांनी सांगितले. धर्मनिरपेक्षता राखून समाजसेवा व सर्व समाजातील गरजू गरीब शेतकरी कष्टकरी गरजू नागरिकांची तसेच अडचणीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची मदत करून कामाच्या माध्यमातून आम्ही पक्ष संघटन मजबूत करू व सर्व समाजातील घटकांना घेऊन चालू असेही त्यांनी नमूद केले. हिंगोली जिल्ह्यातील पक्षाच्या सर्व पदाधिकारी यांनी कार्यकर्त्यांनी हिंगोली येथील संपर्क कार्यालयास भेट द्यावी यावेळी पक्षाचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आपली उपस्थिती दाखवावी असे आवाहन सुद्धा शेख खलील बेलदार यांनी केले.

# मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रूग्णालय कक्षाशी तीन रूग्णालये संलग्नीत

## १४ लाख १० हजार रूपयांची मदत वितरीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**
मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. १ जानेवारी ते आतापर्यंत या कक्षामार्फत हिंगोली जिल्ह्यातील १७ रुग्णांना १४ लाख १० हजार रुपयांची मदत वितरीत करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे नोडल अधिकारी डॉ.नामदेव कोरडे यांनी दिली आहे.
राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतु नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलबध व्हाव्यात, म्हणून आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या हिंगोली येथे हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत कार्यरत आहे.
वैद्यकीय मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नीत हिंगोली जिल्ह्यातील उर्मिला हॉस्पिटल नांदेड रोड, हिंगोली, नाकाडे हॉस्पिटल हिंगोली, जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली या तीन रुग्णालयांचा समावेश आहे. या निधीच्या मदतीतून रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेतात.
गरजू व पात्र रुग्णांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष येथे संपर्क साधावा, असे डॉ. कोरडे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोटरी क्लब जालना इलाईट शहरात राबविणार सजग नागरिक अभियान

# सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून जालना शहरही एक दिवस इंदोरप्रमाणे नावाजले जाईल- डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटच्या पुढाकारातून 'सिविक सेंसेस' अर्थात सजग नागरिक हे आगळे वेगळे अभियान राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून नागरिकांमध्ये नागरी शिस्त, सार्वजनिक स्वच्छतेचे भान, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सार्वजनिक ठिकाणी योग्य वर्तन याविषयी जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. या अभियानाच्या फलकाचे इमोशन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याहस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवार दि. २५ जुलै रोजी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक संस्थांची बैठक पार पडली. यावेळी रोटरी इलाईटने सदरील संकल्पना विशद केली. त्यानंतर या अभियानाच्या फलकाचे विमोचन डॉ. पांचाळ यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे, क्लबचे अध्यक्ष उमेश बजाज, सचिव शरद गादीया, डॉ. प्रल्हाद उढाण, गिरधर लधानी, विनोद देशमुख यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. पांचाळ म्हणाले पुढे की, सामाजिक संस्थानी पुढाकार




घेतला तर जालना शहरही एक दिवस इंदोरप्रमाणे नावाजले जाईल. प्रशासन पूर्णपणे मदतीसाठी तयार आहे. सामाजिक संस्थानी पुढ येवून मदत व मार्गदर्शनही करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, सजग नागरिक अभियानाच्या जनजागृतीसाठी रस्त्यालगत सुचना फलक, डीजीटल प्रचार व्हॅन, पथनाटय, शाळा, महाविद्यालयात कार्यशाळा, विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

### मनपा व रोटरी पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरविणार-उमेश बजाज

यावेळी सजग नागरिक अभियानबाबत रोटरी इलाईट क्लबची भूमिका विशद करताना अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, सजग नागरीक भावना अर्थात सिविक सेन्स जागृत करण्याचे काम म्हणजे डोंगराएवढे आव्हान असले तरी शासन, प्रशासन आणि सर्वांच्या सहकार्याने ते पेलण्याची आमची तयारी आहे. जालना शहरातिल नागरिकांनी काही मूलभूत शिष्टाचार पाळावेत यासाठी जनजागृतीसोबतच सर्वांना या कार्यात सहभागी करून घेण्यासाठी आम्ही अहोरात्र परिश्रम घेणार आहोत. पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब महानगरपालिका आणि क्लब मार्फत जमिनीत जिरवून पाणी पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, ओरडून किंवा मोठमोठ्याने बोलणे टाळावे, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, ओळखीच्या व्यक्तींना नमस्कार किंवा अभिवादन करावे, आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा, वाहतूक नियमांचे पालन करावे, इतरांचा आदर करावा, सर्वांशी चांगले वागावे, कोणाचाही अपमान किंवा अनादर करू नये, आपल्या वस्तूंची काळजी घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत मदत करावी, आजूबाजूच्या परिसरात झाडे लावावी यासाठी जनजागृती व प्रत्यक्ष कार्य केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### अंबड शहरासह ग्रामीण भागात बीएसएनएल च्या नेटवर्क गायब; ग्राहक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**




अंबड शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात भारत संचार निगम लिमिटेड कंपनीचे ४० टॉवर आहे.परंतु सुरळीत मोबाईल सेवा मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत नागरिकांनी बीएसएनएलवर विश्वास दाखवला परंतु शहरासह ग्रामीण भागात ३६ तासांपासून बीएसएनएलची बत्ती गुल झाली नेटवर्क गायब असल्याने लोकांचा डाटा खराब झाला असून ग्राहकांना गेल्या काही महिन्यांपासून बीएसएनएलची मोठ्या प्रमाणात नेटवर्क सेवा विस्कळित होत असल्याने ग्राहकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी बीएसएनएल टॉवरची रेंज पूर्णपणे गायब झाली.असून, यामुळे कॉल करणे किंवा इंटरनेट वापरणे अशक्य झाले आहे.

या समस्येमुळे ग्रामीण भागातील ग्राहक विशेषतः त्रस्त आहेत, कारण त्यांच्यासाठी बीएसएनएल हा अनेकदा एकमेव उपलब्ध पर्याय असतो. विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन शिक्षणापासून ते व्यावसायिकांच्या दैनंदिन कामांपर्यंत, सर्वच गोष्टींवर याचा नकारात्मक परिणाम होत आहे.तांत्रिक बिघाड की देखभालीचा अभाव ? याबाबत बीएसएनएलकडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण आलेले नाही. मात्र, या सततच्या नेटवर्क समस्येमुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. लवकरात लवकर यावर उपाययोजना करून अखंडित सेवा पूर्ववत करावी, अशी अंबड शहरासह ग्रामीण भागातील ग्राहकाकडून मागणी केली जात आहे.

### जाफ्राबाद मंडळ व टेंभुर्णी मंडळाच्या आयोजित रक्तदान शिबिरात १७१ दात्यांनी केले रक्तदान



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र जी चव्हाण साहेब यांनी संपूर्ण राज्यभर रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याचे आवाहन केले होते.

त्यानुसार २२ जुलै रोजी संपूर्ण राज्यभर रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येऊन या रक्तदान शिबिरांची एशिया बुक ऑफ द रेकॉर्ड्स सुद्धा नोंद घेतली आहे. त्याच पार्श्वभूमीवर जाफ्राबाद येथे देशाचे माजी केंद्रीय मंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे साहेब व माननीय आमदार श्री संतोष पाटील दानवे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जाफ्राबाद व टेंभुर्णी मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला माननीय आमदार श्री संतोष पाटील दानवे यांनी भेट देत उपस्थित सर्वांशी संवाद साधला. या शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत १७१ रक्तदात्यांनी रक्तदान करत जालना जिल्ह्यातील रेकॉर्ड ब्रेक रक्तदान शिबिर ठरले आहे. यावेळी रक्तदात्यांना माननीय आमदार श्री संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी विजय नाना परिहार, शालिकराम पाटील म्हस्के, नाना पाटील भागिले, मनोज पाटील शिंदे,भाऊसाहेब पाटील जाधव, सुरेश दिवटे सर, दगडुबा अण्णा गोरे, राजेश पाटील चव्हाण, दत्तू पाटील पंडित,साहेबराव कानडजे, दीपक पाटील वाकडे, विजय परिहार,साहेबराव मोरे,रविराज जैस्वाल,कडूबा शितोळे, राजू साळवे, जगन पंडित, अरुण अवकाळे,मधुकर देठे,राजेश म्हस्के, चेतन लोखंडे, राजू खोत,गजानन शेवत्रे,गौतम म्हस्के,प्रभू गाढे,विनोद राऊत, राजू गायकवाड,निवृत्ती दिवटे,सागर लोखंडे यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच उपसरपंच,आणि रक्तदात्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## परतूर येथे तालुकास्तरीय शिक्षण परिषदेला शिक्षणाधिकाऱ्यांची दांडी

### आमदार बबनराव लोणीकरांनी व्यक्त केली जाहीर नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा परिषदेच्या नवनियुक्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती संगीता भागवत या परतूर तालुकास्तरीय शिक्षण परिषदेला गैरहजर असल्याबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणातून जाहीर नाराजी व्यक्त केली. परतुर तालुक्यातील सर्व शिक्षक एकत्रित आलेल्या असताना शिक्षण परिषदेसारख्या महत्त्वपूर्ण विषयावर शिक्षणाधिकाऱ्यांनाच गांभीर्य नसेल तर ही अत्यंत खेदाची बाब आहे त्या संदर्भात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे विचारणा केली जाईल अशा शब्दात आमदार लोणीकरांनी आपली नाराजी व्यक्त केली.

प्रसंगी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम अंतर्गत प्राथमिक शाळा रायगव्हाण प्रशाला परतुर प्राथमिक शाळा दैठणा बु आनंद विद्यालय संत तुकाराम गुरुकुल लिखित पिंपरी, समर्थ विद्यालय पाटोदा प्राथमिक शाळा कोकाटे हादगाव प्राथमिक शाळा भोंगाने दहिफळ यासह उत्कृष्ट काम करणारे शिक्षक यांचा देखील यथोचित सत्कार आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे सरपंच मेराज खतीब, माजी सरपंच प्रशांत बोनगे बंडू मानवतकर सावता काळे, ड.सुरेश काळे गटविकास अधिकारी श्री राजेश तांदळे गटशिक्षणाधिकारी श्री अशोक सोळंके नवोदय विद्यालय आंबा प्राचार्य श्री मस्के, प्रदीप शर्मा श्री आंधळे सर श्री तांदळे सर केंद्रप्रमुख मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परतूर, मंठा पोलिसांची संयुक्त कारवाई; खुनाच्या गुन्ह्याचा पर्दाफाश

### गुन्हयातील अरोपींना पकडण्यात परतूर पोलिसांची मोलाची कामगिरी !

**तभा वृत्तसेवा**
**परतुर-मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील केंधळी शिवारात विश्वलक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज नावाचा सिमेंटचे गट्टू बनविण्याचा कारखाना आहे. या कारख्यान्याजवळच निवृत्ती सवडे (रा. नांदखेडा, जाफराबाद) आणि मेहुणा हे आपल्या कुटुंबासह राहतात सवडे आणि त्यांच्या मेहुण्याने अनैतिक संबंधाच्या संशयातून त्यांच्या घराजवळ राहणाऱ्या श्रीपाद स्वामी (५५) या एकट्या राहणाऱ्या व्यक्तीस रात्री लाठ्या- काठ्यांनी बेदम मारहाण केली होती. त्यानंतर त्या दोघांनी स्वामी यास जालना येथे जिल्हा रुग्णालयात परस्पर दाखल केले होते. मात्र स्वामी याचा मृत्यू झाला होता. मात्र, सवडे आणि त्याच्या मेहुण्याने स्वामींचा मृत्यू कश्यामुळे झाला ? याचे कारण दडपून ठेवले होते.

अनैतिक संबंधाच्या संशयावरून खून केल्याची घटना केंधळी शिवारातील गट्टूच्या कारखान्याजवळ घडलेली घटना दरम्यान, परतूरचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, मंठा येथील पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक रावते, नंदू खंदारे, गजानन राठोड, किरण मोरे, प्रशांत काळे, कोरडे, मांगीलाल राठोड यांनी संयुक्तरित्या तपासचक्रे फिरवून श्रीपाद स्वामींच्या खुनाचा पर्दाफाश केला असून, खऱ्या आरोपींना निष्पन्न केले आहे. मंठा येथे खुन,परतुरचे पोलीस निरिक्षक सुदाम भागवत,मंठाचे पोलीस निरिक्षक यांनी संयुक्त रित्या कारवाई करत काही तासात आरोपीला ठोकल्या बेड्या,पोलीस उपनिरिक्षक मालाने रावते,ए .एसआय नंदु खंदारे, पि . सि . राठोड,गजानन राठोड,किरण मोरे ,ढवळे, प्रशांत काळे महेश कोरडे यांच्या विशेष पथकाने केला गुन्हा उघड.


## अहिर भवनासाठी निधी कमी पडू देणार नाही –आ.अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरात सर्व सुविधा युक्त, सुसज्ज अहिर भवन उभारणी साठी समाज बांधवांनी जागा निश्चित करावी उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्या माध्यमातून भवन उभारणीसाठी आपण निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

बस स्थानका नजीक अहिर गवळी समाज बाल स्मशानभूमी परिसरात आ. अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून पूर्ण झालेल्या संरक्षण भिंत, पेव्हर ब्लॉक कमान, सुशोभीकरणाचे गुरुवारी ( ता.२४) आ. खोतकर यांच्या हस्ते थाटात लोकार्पण करण्यात आले. शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, नंदलाल सतीकर,प्राचार्य डॉ. दयानंद भक्त,मोतीलाल भगत, ड.हरिश्चंद्र चौधरी, नंदकिशोर जांगडे, मेघराज चौधरी, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

आ. अर्जुनराव खोतकर पुढे बोलतांना म्हणाले, ईदगाह, संतोषी माता मंदिराकडे जाण्यासाठी सदर रस्ता डि. पी रोड मध्ये समाविष्ट केला जाईल. असे सांगून जालना शहरातून वाहणाऱ्या सर्व नद्यांचे सुशोभिकरण करण्याचा संकल्प आपण केला असून शहरातील सर्व सांडपाणी नदीकाठातून भुयारी गटाराद्वारे रोहनवाडी येथे प्रक्रिया केंद्रावर नेऊन



जलशुद्धीकरण केले जाईल, तसेच पाणी पातळी वाढण्यासाठी बॅरेजेस उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे आ. खोतकर यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. दयानंद भक्त यांनी स्मशानभूमीत हाय मॅक्स पथदिवे, राहिलेली एक भिंत आणि रस्त्यावर गट्टू बसवावेत अशा मागण्या केल्या.

विष्णू पाचफुले यांनी दिलेला शब्द पूर्ण करण्याची धमक आ.अर्जुनराव खोतकर यांच्यातच आहे असे सांगितले. अहिर गवळी समाजाच्या वतीने आ. खोतकर यांचा सत्कार करण्यात आला.

सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर मेघराज चौधरी यांनी आभार मानले. यावेळी कुंदन काठोठीवाले, प्रभूलाल गोमतीवाले, गणेश जाफ्राबादी,अमरचंद देवावाले, किशोर जांगडे, गोपाल काबलिये, कन्हैया जांगडे, विशाल दिपवाल, धनराज चौधरी,राजेंद्र जाधव, कन्हैया भुरेवाले, गंगलाल भुरेवाले, प्रा. शाम काबुलीवाले, संतोष जांगडे, सावरिया जटावाले, शिवराज नारियलवाले, लालू गोमतीवाले,राजेश देवावाले, मुकेश जांगडे ,कपिल चौधरी, जीवन भगत, मनोज चौधरी,नितीन जांगडे, प्रदीप चौधरी,रूदेश चौधरी, वैभव दीपवाल, धनेश चौधरी, मनोज काबलिये, अक्षय गौरक्षक,पवन खाकीवाले, महेश कुटलियावाले, तुषार भगत, सोहम खाकीवाले ,विनायक चौधरी,विष्णू भगत, देवेंद्र सतीकर ,शंकर भुरेवाल,कृष्णा भगत, अभिषेक काबलिये, पवन भगत, अंकित गौरक्षक, तुषार भगत, क्रिश भगत, तुषार चौधरी, हिमेश भगत, युवराज भुरेवाल, यतेंद्र सतीकर,सचिन भुरेवाल, गणेश जटावाले, यांच्या सह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भालेकर कुटूंबाला शरद पवार गटाची आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

शेतात काम करत असताना विजेचा शॉक लागून संदीप रामभाऊ भालेकर यांचे निधन झाले. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जालना जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी भालेकर कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

कपिल आकात यांनी शोकाकुल कुटुंबियांना आधार देत तातडीची मदत म्हणून रु. २१,००० रु आर्थिक मदत दिली. या कठीण प्रसंगी ते म्हणाले की, शेतकऱ्यांचे आयुष्य किती कठीण आहे हे अशा घटनांमधून वारंवार समोर येते. मृतांच्या कुटुंबाला या दुःखातून सावरण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. भालेकर कुटुंबियांसोबत संवाद साधताना आकात यांनी शासनदरबारी योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही दिले. या भेटीप्रसंगी अनेक स्थानिक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये स्व.संदीप यांचे वडील रामभाऊ भालेकर, माजी नगराध्यक्ष विनायक आप्पा काळे, माजी नगरसेवक अंकुशराव तेलगड, विजय राखे, अखिल काजी , सिद्धार्थ बंड, अंकुश भालेकर यांचा समावेश होता.

## ना.देवेंद्र फडणवीस व ना.पंकजाताई मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा जालना महानगर जिल्ह्यात ३४८ रक्तदात्यांनी केले रक्तदान

### जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वात शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस व जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा.ना. श्रीमती पंकजाताई मुंढे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपा नेते श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वाखाली भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून जालना महानगर जिल्ह्यामध्ये एकूण ३४८ जणांनी रक्तदान करून सामाजिक भान जपून रकतदानाचा विक्रम केला.

यामध्ये जुना जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. महेश निकम यांच्या मंडळात सर्वाधिक १२१ रक्तदान झाले, तसेच जालना ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष श्री. संजय डोंगरे यांच्या मंडळात १११, पूर्व जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोल धानुरे यांच्या मंडळात ६१, नविन जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. सुनील खरे यांच्या मंडळात ५५ रक्तदान झाले. असे एकूण जालना महानगर जिल्ह्यामध्ये एकुन ३४८ रक्त दात्यांनी रक्तदान केले.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी राजेश राऊत, बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर भांदरगे, विमलताई आगलावे, विजय कामड, सतीष जाधव, सोपान पेंढारकर, धनराज काबलीये, भागवत बावणे, कपिल दहेकर, अर्जुन गेही, अनिल सरकटे, संध्याताई देठे, सुभांगीताई देशपांडे, सखुबाई पणबिसरे, सिद्धिविनायक मुळे, राजेंद्र भोसले, शशिकांत घुगे, सुभाष मामा पवार, राजू गवई, सोमेश काबलीये, सय्यद इम्रान, वसंत शिंदे, सुनील पवार, शिवराज जाधव, रवींद्र अग्रवाल, सुमीत सुरडकर, सुहास मुंढे, शिवराज नारीयलवाले, शाम ऊगले, सिद्धेश्वर हाजबे, सोमेस काबलिये, मनोज बिडकर, जुनेद मिर्झा, माणिक फड, विष्णु दादा भूतेकर, बबनराव सिरसाठ, काकासाहेब घुले, पुंजाराम भूतेकर, कैलास उबाळे, मुकेश चव्हाण, संजय जाधव, राजाराम (राजे) जाधव, सतीश केरकळ, नागेश अंभोरे, गजानन खरात, बद्रीनाथ भसांडे, दौलत भुतेकर, महेश मुळे, विष्णु डोंगरे, दत्ता जाधव, ज्ञानेश्वर राठोड, विजय मोहिते, अनिल यशवंते, तुकाराम कळकुंबे, नारायण मोहिते, संतोष खंडेलवाल, कृष्णा गायके, गोपाल चौधरी, प्रदीप देठे, जगदीश यंगूपटला, सुदर्शन काळे, अजय कोल्हे, गौरव गोधेकर, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, देविदास देशमुख,



गुलाब पणबिसरे, सिद्धार्थ संचेती आदींची उपस्थिती होती.

भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस रक्तदानाच्या माध्यमातून साजरा केला जात आहे, हे निश्चितच प्रेरणादायी आहे. रक्तदान ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. आपल्या थोड्याशा योगदानातून एखाद्याचे संपूर्ण आयुष्य वाचू शकते असे त्यांनी सांगितले व सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल व रक्दात्यांचे आभार मानले. शिबिरात संकलित झालेले रक्त जनकल्याण रक्तपेढी, जालना यांच्या सहकार्याने संकलित करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्रावण सरी बरसल्याने पिकांना मिळाले जीवदान

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२६ जुलै -**

श्रावण महिन्याच्या प्रारंभीच आलेल्या श्रावणसऱ्यांमुळे किनवट तालुक्यातील कोरड्या पडलेल्या शेतजमिनींना आणि सुकू लागलेल्या पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, अजूनही ठोस आणि जोरदार पावसाचा तालुक्याला अत्यंत आवश्यक असलेला लाभ झालेला नाही. नदीनाल्यांमध्ये पुरेसं पाणी वाहिलं नसल्याने भूगर्भातील पाणीपातळी वाढण्यास अद्याप वेळ लागणार आहे.

गेल्या तीन आठवड्यांपासून किनवट तालुक्यात पावसाने चांगलाच दडी मारल्यामुळे जवळपास ८० हजार हेक्टर क्षेत्रातील पिके धोक्याच्या छायेत आली होती. अनेक ठिकाणी खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, उडीद, भात यांसारख्या पिकांचे वाया जाण्याची वेळ आली होती. परंतु गुरुवारी (दि. २४ जुलै) पासून



तालुक्यात काही भागांत रिमझिम, तर काही भागांत दमदार स्वरूपाचा पाऊस पडू लागल्याने सुकू लागलेल्या पिकांना काही प्रमाणात जीवनदान मिळाले आहे.

मे महिन्यात अवकाळी पाऊस झाला, तर जूनमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने अनेकांनी कसेबसे पेरण्यांचे काम उरकले. ग्रामीण भागात आखाडीची झड म्हणून प्रचलित असलेली आषाढी एकादशीदरम्यानही पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र श्रावण सरींनी त्यांना काहीसा दिलासा दिला आहे. आता नागपंचमी सणाच्या सुमारास म्हणजे पंचमीचा झड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आठवड्यात समाधानकारक पाऊस झाला, तर पिकांची वाढ चांगली होऊन शेतकरी सुखावतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

शुक्रवारी (दि. २५) देखील दिवसभर आकाश ढगाळ होते आणि हलकासा पाऊस अनेक भागांमध्ये सुरूच होता. यामुळे तापमानात घट झाली असून शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे. मात्र, पुढील काही दिवसांत दमदार पाऊस झाल्यासच पिकांचा अपेक्षित विकास होऊ शकेल.

तालुक्याच्या डोंगराळ भागातील मुरमाड जमिनीत पेरलेली पिके पाण्याअभावी वाळत चालली होती. काही भागांमध्ये तर शेतकऱ्यांना दुबार पेरणीचा पर्याय स्वीकारावा लागला आहे. काळ्या सुपीक जमिनी भेगाळू लागल्याने पेरलेली बियाणे उगवलीच नाहीत किंवा उगवल्यानंतर सुकून गेली आहेत.

ज्यांच्याकडे काही प्रमाणात सिंचनाची सोय आहे, त्या शेतकऱ्यांनी पिके तग धरून ठेवली असली तरी सतत कमी होत चाललेली पाणीपातळी ही चिंतेची बाब बनली आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीत सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान झाले होते. यावर्षी मात्र स्थिती उलट असून शेतकऱ्यांचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत. दमदार पावसाची नितांत आवश्यकता असून, पुढील काही दिवसात पाऊस झाला नाही तर खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# हडसनी येथील जुगार अड्ड्यावर धाड



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२६ जुलै -**

माहूर पोलिसांनी पोलिस अधीक्षक पथकासोबत आज मध्यरात्री केलेल्या एका संयुक्त कारवाई दरम्यान तालुक्यातील हडसनी येथील एकाच्या घरासमोरील अंगणात अवैधरित्या विनापरवाना ताश पत्ते अंदर बाहर एक्का बादशाह नावाचा जुगार खेळत असताना ८ जणांना रंगेहाथ पकडले. या धाडीत रोख रक्कम २ हजार ५० व जुगार साहित्य पोलिसांनी हस्तगत केले असून,त्यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज शनिवार दिनांक २६.०७.२०२५ रोजी मध्यरात्री १२:१५ वाजता मौजे हडसनी येथील एकाच्या घरासमोरील अंगणातील जनावरांचे गोठ्यात काही जण ताश पत्ते जुगार खेळत असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचे नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक संदीप अन्येबोईनवाड आणि पोलिस अधीक्षक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक ए.वि.डाके यांनी पोका. सोनटक्के, अमोल राठोड यांना सोबत घेऊन सदर ठिकाणी जाऊन संयुक्त धाड टाकत ताश पत्ते जुगार खेळणाऱ्या ८ जणांना रंगेहात पकडले. त्यांचेकडून ताश पत्ते जुगार साहित्यासह रोख रक्कम २ हजार ५० रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.विशेष म्हणजे सर्वच्यासर्व ८ ही आरोपी हे स्थानिक हडसनी येथील रहिवाशी असून त्यातील व्यवसायाने चौघे हे शेतकरी,एक मजुरी, एक व्यापारी आणि दोघे हे शिक्षण घेत असलेले विद्यार्थीदशेतील तरुण आहेत.

पोकॉ दत्ता सोनटक्के यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे माहूर येथे त्यांच्यावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृत्त लिहीपर्यंत यातील कोणासही अटक करण्यात आली नसून, नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती पोउनि अन्येबोईनवाड यांनी दिली आहे. या कारवाईचा पुढील तपास पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल गजानन चौधरी हे करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### नरसी येथील श्रीराम मंदिरात श्रीराम कथा महोत्सव

**नायगाव** -नरसी येथील श्रीराम मंदिरात श्रावण मासाच्या पवित्र पर्वावर भक्तिभावाने नटलेल्या, संगीतमय श्रीराम कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. रामकिशन महाराज यांच्या मधुर आणि रसाळ वाणीतून ही कथा २५ जुलै ते ३१ जुलै दरम्यान, दररोज संध्याकाळी ७ ते १० या वेळेत रंगणार आहे. सद्गुरू चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या कृपा आशीर्वादाने या सात दिवसांत भक्तिरसात न्हालेल्या वातावरणात श्रीराम कथेचा सोहळा पार पडणार आहे. नरसी सह अन्य परिसरातील सर्व श्रद्धावान भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या भक्ती-ज्ञान यज्ञाचे औचित्य संत तुलसीदास गोस्वामी यांच्या जयंतीनिमित्त साधण्यात आले असून, श्रीक्षेत्र आळंदी ते पंढरपूर पायी वारीतील भक्ती संवेदना या महोत्सवात अनुभवता येणार आहेत. कार्यक्रमाचा समारोप ३१ जुलै रोजी दुपारी आरती, गुलालोत्सव आणि त्यानंतर महाप्रसादाने होणार आहे. यानंतर रात्री भगवान महाराज मुगांवकर यांच्या हृदयस्पर्शी कीर्तनाने महोत्सवाची सांगता होईल.या वर्षीच्या धार्मिक व सांस्कृतिक समृद्धीचा हा उत्सव भक्तांना भक्तिरसात चिंब भिजवणारा ठरणार आहे.

### दिव्यांग व्यक्तीसाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**नरसी**-नायगाव येथील झोलेबाबा निवासी अपंग विद्यालयात दिव्यांग मुलांसाठी व मानसिक दिव्यांग व्यक्तीसाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर हे दि.२५ जुलै २०२५ रोजी शुक्रवारी तालुका विधी सेवा समितीच्या वतीने घेण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई, व अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड एस. जी. वेदपाठक तसेच सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड एस. जी. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कायद्याची ओळख व्हावी यासाठी सांगितले असल्याने आज दि.२५ जुलै रोजी शुक्रवारी तालुका विधी सेवा समितीच्या वतीने शिबीर घेण्यात आले होते. नायगाव येथील झोलेबाबा निवासी अपंग विद्यालयातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायगाव न्यायालयाच्या विधिज्ञ ए.टी.गित्ते या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन नायगाव वकील संघाचे अध्यक्ष एल.एस. तुमेदवार व एस.एन.जाधव हे होते. नायगाव न्यायालयाच्या विधिज्ञ ए.टी.गित्ते यांनी मानसीक तसेच शारिरीक दिव्यांगाना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये येण्यासाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन करून कायदे विषयक माहिती दिली. यावेळी मुख्याध्यापक पांडुरंग पंगे, हौसाजी भगत, हानुमान चौधरी, रमेश चव्हाण, संगंम देशमुख, शिवलिंगम संगम, गोपाल हंबर्डे, अनिल जाधव यांनी शिबीर व्यवस्थेसाठी बहुमोल सहकार्य केले. या शिबीर प्रसंगी शारीरीक व मानसीक दिव्यांगासह पालक तसेच परिसरातील नागरीक उपस्थित होते.

### ना. मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री रेणुकादेवीच्या महाआरतीने अभिष्टचिंतन

**माहूर** -भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव आणि महाराष्ट्र विधान परिषदेच्या एमएलसी तथा राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि वातावरण बदल कॅबिनेट मंत्री ना. पंकजा मुंड यांच्या वाढदिवसनिमित्त आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी माहूर तालुक्याच्या वतीने गडावरील श्री रेणुकादेवी मंदिरात मातेची महाआरती करून ना. पंकजाताई यांच्या दिर्घायुष्यासाठी अभिष्टचिंतन करण्यात आले. तदनंतर माहूर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालय परिसरात विविध वृक्षांचे वृक्षारोपण व रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप असे विविध उल्लेखनीय कार्यक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष नीलकंठ मस्के, तालुका सरचिटणीस विनायक मुसळे,शहराध्यक्ष गोपु महामुने,राजेंद्र केशवे,अनिल वाघमारे, कांतराव घोडेकर,विलास चौधरी, नंदकुमार जोशी, नंदकुमार कोलापवार, फिरोज भाई पठाण, हर्षदीप दीक्षित, मनीष राठोड,नीलेश तायडे, संजय शेडमाके, पवन चौहान, अंकुश शिंदे, योगेश परसवाळे, नवनीत देवपुलवार,पद्मा गिऱ्हे, उर्मिला बनसोडे, स्वाती आड़े, अर्चना दराडे यांसह मोठ्या संख्येने भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### बाबुराव गुणवंतराव पा. सुर्यवंशी यांचे निधन

**देगलूर** -गोजेगाव येथील जेष्ठ नागरिक बाबुराव गुणवंतराव पा. सुर्यवंशी यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्यविधी ५ वाजता गोजेगाव येथे करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले विद्यालय देगलूर येथे सहशिक्षक पदावर कार्यरत असणारे राजकुमार (मुन्ना) सुर्यवंशी सर यांचे ते वडील होत. या दुःखद घटनेमुळे सुर्यवंशी कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात सावित्रीबाई फुले प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, देगलूर सहभागी आहे.त्याच्या पश्चात मुलं,मुली नातवंड असा खुप मोठा परिवार आहे.




**टि . सी हरवली**

माझी गायकवाड चंद्रकांत मारोती या नावाची मुळ टि सी इतर महत्वाचे कागदपत्रे भोकर ते नरसी बस प्रवासा दरम्यान प्रवास करते वेळेस इयत्ता सातवी पासची टी.सी.हरवली आहे . तरी कृपया कोणाला सापडल्यास खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा ...

**संपर्क**
**गायकवाड चंद्रकांत मारोती रा. येलापूर**
**ता. धर्माबाद जि. नांदेड मो. नंबर .**
**७९ ७२ २८ ५५ ५६**


# कृषी विद्यापीठ आपल्या दारी,तंत्रज्ञान शेतावरी

## कार्यकारी परिषदेचे सदस्य भागवत देवसरकर यांचा अभिनव उपक्रम

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२६ जुलै -**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यापीठ आपल्या दारी तंत्रज्ञान शेतावरी हा २ दिवसाचा अभिनव उपक्रम शुक्रवार दि.१ऑगस्ट ते शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी हदगाव तालुक्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य भागवत देवसरकर यांनी दिली आहे.



या उपक्रमात कृषी विद्यापीठाचे शिक्षण विभागाचे संचालक तथा अधिष्ठाता डॉ.भगवान आसेवार,विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल रामटेके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय कळसाईत, केळी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. शिवाजीराव शिंदे कीटकशास्त्रज्ञ डॉ.बी व्ही भेदे,हवामान विभागाचे कृषी विस्तारतज्ञ डॉ. वसंत सूर्यवंशी कृषी विज्ञान केंद्राची शास्त्रज्ञ डॉ.माणिक कल्याणकर,तालुका कृषी अधिकारी सदाशिव पाटील आदी मान्यवर सहभागी होणार आहेत,शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन विविध पिकावर झालेल्या किड व रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तज्ञ अधिकारी हळद कापूस सोयाबीन तूर ऊस या पिकांच्या कीड रोग व्यवस्थापन, पीक व्यवस्थापन या विषयावर सविस्तर माहिती देणार आहेत.

शुक्रवार १ ऑगस्ट रोजी सकाळी १० वा.वडगाव बुद्रुक, कोळगाव,कंजारा, शिवनी, वाळकी बाजार, धानोरा टाकळा व वाळकी बुद्रुक मोठी या गावात भेटी देणार आहेत,शनिवार दिनांक २ ऑगस्ट रोजी उमरी जहागीर वायफना बुद्रुक,येवली,पिंपळगाव राजवाडी गवतवाडी तळ्याचीवाडी घोगरी, चिकाळा ब्रम्हवाडी या गावात शेतावर जाऊन पिकाची पाहणी करून शास्त्रज्ञ,अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत, शेतकरी बांधवांनी या उपक्रमात सहभागी होऊन शास्त्रज्ञ व अधिकाऱ्याकडून आपल्या पिकाच्या कीड व रोगाविषयी व उत्पादन वाढीसाठी माहिती घ्यावी व जास्तीत जास्त संख्येने शेतकरी बांधवानी सहभागी व्हावे असे आवाहन कार्यकारी परिषद सदस्य भागवत देवसरकर यांनी केले आहे.

# नागपंचमी निमित्त यात्रा महोत्सव आणि कब्बडी स्पर्धेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ जुलै -**

दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी नागपंचमी सणा निमित्त लोहा तालुक्यातील सावरगाव येथील केसू नाईक तांडा येथे नागदेव यात्रा महोत्सव आणि खुल्या कब्बडी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. २८ जुलै रोजी कब्बडीचे सामने रंगणार असून २९ जुलै रोजी यात्रा महोत्सव पार पडणार असल्याची माहिती नागेश्वर मित्र मंडळाच्या वतीनेदेण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोहरागड येथील महंत तथा आमदार बाबू महाराज तर उदघाटक म्हणून आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांची उपस्थिती असणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून बंजारा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष देविदास राठोड,माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भगवान राठोड, डॉ पुरुषोत्तम धोंडगे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. कब्बडी स्पर्धेत पहिले रोख बक्षीस ३१ हजार १०१ रुपये, द्वितीय बक्षीस २१ हजार १०१, तृतीय बक्षीस १५०१ रुपये, चौथे बक्षीस ११ हजार १०१ रुपये असणार आहे. महोत्सवा निमित्त नागदेव मूर्तीची पूजा अर्चा आणि महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# नांदेड रुलर डेंटल कॉलेजच्या वतीने मूकबधिर मतिमंद विद्यार्थ्यांना दंत आरोग्य विषयी माहिती

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२६ जुलै -**

नांदेड रुलर डेंटल कॉलेजच्या वतीने मूकबधिर व मतिमंद विद्यार्थ्यांना दंत आरोग्य विषयी माहिती दिनांक २५ जुलै २०२५ रोजी नांदेड शहरातील आर आर मालपाणी आणि श्रीराम प्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालय मगनपुरा नवा मोंढा नांदेड येथे विद्यार्थ्यांना दंत विषयी स्वच्छतेची माहिती देण्यात आली.

नांदेड रुलर डेंटल कॉलेज अँड रिसर्च सेंटर नांदेड येथील शिकाऊ विद्यार्थ्यांनी एका कॅम्पद्वारे मतिमंद व मूकबधिर येथे डाळश्रश छपवशव हा उपक्रम सुरू करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना दंत आरोग्य व उपचार यांच्या



माध्यमातून सेवा करण्याची संधी उपलब्ध झाली आणि त्यांना जीवन उपयोगी वस्तू भेट स्वरूपात देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थी मध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसून आले व शैक्षणिक साहित्य वाटप, अन्नदान, सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यासोबत आनंद. सोबतच त्यांना काळानुसार उद्भवणारे गंभीर आजार याची माहिती देऊन देण्यात आली. स्वच्छ व सर्वांचे संरक्षण करावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी

मूकबधिर विद्यालयाचे सर्व विद्यार्थी व शिक्षक आणि परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती

# कारगील दिवस सैनिकांच्या शौर्याची आणि बलिदानाची आठवण करून देतो :गुंडमवार



**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२६ जुलै -**

कारगील विजय दिवस आपल्याला भारत देशाच्या शूर सुपुत्रांच्या अदम्य धैर्याची, शौर्याची आणि सर्वोच्च बलिदानाची आठवण करून देतो हा दिवस आपल्याला केवळ अभिमानाने भरून टाकत नाही तर देशाचे रक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी सर्व प्रकारच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार असले पाहिजे याची आठवण करून देतो अशी भावना तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी शहीद प्रफुल कुमार गोवंदे यांना आदरांजली पर बोलताना व्यक्त केले.

या प्रसंगी तहसीलदार विनोद गुंडमवार सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश जाधव, नगर परिषद चे जावेद ईनामदार,तलाठी अनिल मुनेश्वर,विशाल चौधरी,अनंता जोशी,बालाजी पाटील पत्रकार जयभीम पाटील,अरुण डोईफोडे, मुख्याद्यापक बाळासाहेब गाडे,आदि मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले कारगिल युद्ध २६ जुलै भारताच्या विजयाची गाथा सर्वत्र गायली जाते तेव्हापासून दरवर्षी ऑपरेशन विजयमध्ये भाग घेतलेल्या सैनिकांचा अभिमान आणि शौर्य पुन्हा जागृत करण्यासाठी दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो हा दिवस २६ जुलै १९९९ रोजी कारगिल युद्ध म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेतलेल्या पर्वताच्या उंचीवर भारतीय सैनिकांच्या विजयाचे प्रतीक आहे म्हणुन २६ जुलै हा दिवस 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो दर वर्षी प्रमाणे याही वर्षी म्हणजे आज २६ जुलै २०२५ रोजी शहीद प्रफुल कुमार गौवंदे नियोजीत स्मारक भोकर येथे त्यांच्या स्मारक ठिकानी शहीद प्रफुल कुमार गोवंदे यांच्या सह शहीदाना अभिवादन करण्यात आले या वेळी शहीद पिता गणपतराव गौवंदे,शहीद माता आशा गौवंदे,मधुकर गौवंदे ,संतोष गौवंदे,भगवान दंडवे,गोविंद गौड पाटील,उद्योजक कांता जोंधळे,विक्रम क्षिरसागर,पत्रकार मनोज शिंदे, तोसीफ ईनामदार,गौतम कसबे ,राहुल कदम,सखाराम वाघमारे,मॉन्टी न्याकावार,तुका देशपांडे उमेश दुधारे,सुनील शहा,संतोष डोंगरे,बाळु काळे,माधव पवार,रमेश दुधारे,दिगांबर कदम,संतोष जैन,विजय वाघमारे,हनंमत माने मामा,अतुल देशमुख,अंकुश राठोड,साहेबराव राठोड,बाळु देशमुख,गोविंद देशमुख, बारकु ससाने आदि सह देश प्रेमी नागरिक उपस्थीत होते.

# वन्यप्राण्यांमुळे शेत पिकांची नासधूस; नुकसान भरपाई देण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.२६ जुलै -**

तालुक्यातील बहुतांश गावे ही घनदाट जंगलाने वेढलेली असल्यामुळे शिवारातील शेतीतील पिकांचे हरीण,काळविट,रानडुक्कर यासह इतर काही वन्यप्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणात नासधूस होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. तर वन्यप्राण्यांचे शेतकऱ्यांवर,शेतमजूरांवर घातक हल्ल्याच्या घटनाही घडत आहेत. तालुक्यातील अशा नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करून त्यांना तातडीने नुकसान भरपाई म्हणून वनविभागाच्यावतीने अनुदान देण्यात यावे ,या मागणीसाठी तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांना दी.२५ जुलै रोजी लेखी निवेदन देण्यात आले.

यावेळी तालुका प्रमुख जितू चोले, तालुका संघटक सुशील जाधव,माजी सभापती डॉ. नामदेव कातले यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तन सप्ताह

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ जुलै -**

नांदेड लोकसभेचे माजी खासदार तथा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील अनेक भागात कीर्तन सोहळे आयोजित करण्यात आले आहेत. सर्वत्र श्रावणधारा कोसळत असताना आता भाविक भक्तांवर संत विचारांच्या भक्तीधारा ओल्या चिंब करणार आहेत. भक्तीरसात राहून निघण्यासाठी भाविक भक्तांनी आणि आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

दिनांक १ ऑगस्ट रोजी शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता हरिभक्त पारायण निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तनाचा सोहळा कै. बाळाजी पाटील पवार मंगल कार्यालय लोहा येथे आयोजित करण्यात आले आहे. संग्राम मोरे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या इंदुरीकर महाराजांच्या कीर्तन सोहळ्याचे उद्घाटन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे . दिनांक ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बाजार मैदान सोनखेड येथे सुनील मोरे यांच्या पुढाकारातून हरिभक्त पारायण विनोदाचार्य निवृत्ती महाराज बुलढाणेकर यांचा कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता हरिभक्त पारायण पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम माळाकोळी तालुका लोहा येथे ना.ना. तिडके यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला आहे. याच दिवशी दुपारी २ वाजता हरिभक्त पारायण शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम शंकर माधवराव माली पाटील मारताळेकर उर्फ बाळू पाटील चेअरमन यांच्या पुढाकारातून मारताळा येथे आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता हरिभक्त परायण प्रकाश महाराज साठे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आ. चिखलीकर यांच्या मूळ गावी चिखली येथे शंकरराव पवळे चिखलीकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला आहे. आयोजित करण्यात आलेल्या सर्वच कीर्तन सोहळ्याला भाविक भक्तांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सुधारित पिक विमा योजनाचा ३१ जुलैपर्यंत लाभ घ्यावा-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२६ जुलै**

राज्यात यावर्षी सुधारित पंतप्रधान पिक विमा योजना लागू करण्यात आली आहे. यामध्ये खरीप हंगामातील भात, बाजरी ,मुग, उडीद ,तुर, मका ,कापूस ,सोयाबीन, कांदा ,भुईमूग आधीसह दहा पिकाचा समावेश आहे. शेतकऱ्यांना ३१ जुलै पर्यंत अर्ज दाखल करता येणार असून अर्जासोबत आता ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई -पीक पाहणी बंधनकारक करण्यात आले आहे. सुधारित पीक योजनेत ३१ जुलै पर्यंत सहभाग घेता येणार आहे .तरी जास्तीत जास्त शेतकरी वर्गाने याचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.



उत्पादनावर आधारित सुधारित पंतप्रधान पीक योजना खरीप हंगाम २०२५ २६ या वर्षासाठी लागू करण्यात आली आहे नैसर्गिक आपत्ती कीड आणि रोगासारख्या प्रतिकूल परिस्थिती मुळे पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे ,स्थैर्य अबाधित राखणे, शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे आधीचे उद्दिष्ट आहे. ही योजना गेल्या दोन वर्षात प्रति अर्ज एक रुपया भरून राबविण्यात आली होती. आता पिक निहाय हेक्टरी विमा हप्ता रक्कम निश्चित करण्यात आली आहे. पिकासाठी जोखीम स्तर ७० टक्के निश्चित करण्यात आलेला आहे. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. या योजनेत मृत शेतकऱ्यांची नावे तसेच इतर अवैद्य मार्गाने विमा काढला गेल्यास तो अर्ज रद्द केला जाणार असून, या पिक योजना सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र सातबारा , बँक पासबुक, स्वयंघोषणापत्र आदी ई- पीक पाहणी अंतर्गत पिकाची नोंद करणे बंधनकारक असल्याचं कृषी अधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले. तरी या सुधारित पीक योजनेत जास्तीत जास्त शेतकरी वर्गाने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

# अंबाजोगाईत जोरदार पाऊस सुरु शेतकऱ्यांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ जुलै**

अंबाजोगाईत पावसाने गेल्या दोन दिवसांपासून पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली आहे. सतत रिमझीम पावसामुळे गेल्या दोन - तीन दिवसापांसून ढगाळ वातावरण पहावयास मिळत आहे. त्यातच कालपासून पावसाचा जोर आणखी वाढला असून आज शनिवार रोजी संततधार सुरुच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे तर काही प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, शहरातील काही भागात नाल्याचे पाणी रस्त्यावर आल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

अंबाजोगाईत २५ जुलैपासून पावसाचा जोर वाढला आहे. पावसाच्या सरी कमी - अधिक प्रमाणात सुरूच आहेत. अंबाजोगाई शहरासह तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण आहे. त्यातच पावसाचा जोर कायम आहे.

अंबाजोगाईत काल रात्रीपासून संततधार पाऊस सुरू आहे. काही वेळ पावसाचा जोर थोडा वाढतही आहे. त्यातच पावसामुळे हवेत गारवा वाढला असून नागरिक उबदार कपडयांचा वापर करीत आहेत. अंबाजोगाई शहरासह तालुक्यात संततधार पाऊस सुरू असल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचले आहे. विशेषत: सखल भागात पाणी साचल्याने तेथून नागरिकांना चालताना कसरत करावी लागत आहे.

# युथ आयकॉन विलास बडे यांच्या व्याख्याननास उपस्थित रहा-निळकंठ चाटे,नरसिंग सिरसाट

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ जुलै**



राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. २७ जुलै रोजी परळीत प्रसिद्ध वक्ते,युथ आयकॉन पत्रकारितेतुन सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे,सामान्य कार्यकर्त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे युथ आयकॉन विलास बडे यांचे रविवार दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे व्याख्यान होणार आहे.हे व्याख्यान खासकरुन सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा असणार्या व सोशल मिडीयात सक्रिय असणार्या युवक युवतींसाठी उपयुक्त असुन या व्याख्यानाचा परळीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे आणि भाजपा युवानेते नरसिंग सिरसाट यांनी केले आहे.



विलास बडे यांच्या व्याखानाचे आयोजन करण्यात आले असुन या व्याखानाला युवक आणि नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे,भाजपाचे युवानेते नरसिंग सिरसाट यांनी केले आहे.

# केवळ दोन वर्षांचे वय पूर्ण होण्यापूर्वीच जागतिक कीर्तीचा मान ध्रुव युवराज चरखा याची वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ जुलै**

बीड जिल्ह्यातील चिमुकला ध्रुव युवराज चरखा याने केवळ दोन वर्षांचे वय पूर्ण होण्यापूर्वीच आपली असामान्य बुद्धिमत्ता सिद्ध करत वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये आपले नाव कोरले आहे. लहान वयात मिळवलेला हा विक्रम संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाचा विषय ठरत आहे.




सध्या ज्या वयात लहान मुले टीव्ही, मोबाइल गेम्स, यूट्यूब आणि सोशल मीडियामधील व्हिडीओ, रिल्स पाहण्यात अधिक रममाण असतात, त्या वयात ध्रुवने मराठी व इंग्रजी भाषेतील महिने, अंक, आठवड्याचे दिवस, विविध श्लोक, देशांचे झेंडे, प्राणी, पक्षी, भाज्या, फळे व दिशा अचूक ओळखण्याची क्षमता विकसित केली आहे. तसेच पाढे सांगण्याचे कौशल्यही त्याने लहान वयातच आत्मसात केले आहे.

ध्रुवने दीड वर्षाचे असतानाच विविध गोष्टी बोलून दाखवण्यास सुरुवात केली होती. पालकांच्या मार्गदर्शनाखाली, कमी स्क्रीन टाईम, संतुलित आहार, कौटुंबिक संवाद आणि सततच्या उत्तेजनामुळे त्याने हळूहळू अधिकाधिक ज्ञान आत्मसात केले. त्याच्या या उल्लेखनीय प्रगतीची दखल घेऊन वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड संस्थेमार्फत त्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे.

ध्रुवच्या या यशामागे पालकांचे सातत्य, योग्य दिशा आणि स्वयंप्रेरणेने अभ्यास करण्याची त्याची वृत्ती आहे. त्याच्या या बालकामगिरीने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.ध्रुव युवराज चरखा याच्या या जागतिक कीर्तीच्या विक्रमाबद्दल जिल्ह्यातून तसेच विविध स्तरांमधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्याच्याकडून भविष्यात आणखी यशस्वी कार्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून साजरा

### जनसेवेसाठी ताई साहेबांना शतायुष लाभो - राजेश गित्ते

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ जुलै**

महाराष्ट्र राज्य पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसा निम्मित वाढदिवस- ताई साहेबांचा संकल्प - सामाजिक बांधिलकीचा उपक्रम साजरा करण्यात आला.या अंतर्गत आज दि. २६/०७/२०२५ शनिवार रोजी श्री सोमेश्वर प्रभुस महाअभिषेक करून ताई साहेब यांना जनसेवेसाठी शतायुष लाभो अशी प्रार्थना करण्यात आली. टोकवडी येथे पशु वैद्यकीय शिबीर घेण्यात आले. सेलू परळी येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला तसेच बेलंबा आणि वैजवाडी येथे ही पदाधिकारी यांनी वृक्षारोपण केले . स्वच्छता अभियान अंतर्गत बुद्ध विहार मिरवट, राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर मंदिर दादाहरी वडगांव, सावता महाराज मंदिर लोणी येथे भाजपा पदाधिकारी यांनी स्वच्छता केली.



शैक्षणिक प्रगती अभियान अंतर्गत सोमेश्वर विद्यालय जिरेवडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

जनसेवा अभियान अंतर्गत वैद्यनाथ मंदिर परिसरातील निराधार व्यक्तींना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

*समाजोपयोगी उपक्रम समारोप प्रसंगी बोलताना परळी वैजनाथ भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी जनसेवेसाठी ताई साहेब यांना शतायुष लाभो ही प्रभु वैद्यनाथा (पंचम ज्योतिर्लिंग) कडे प्रार्थना केली*. तसेच सर्व कार्यक्रम यशस्वी केल्या बद्दल सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे आभार मानले.

परळी तालुक्यातील सर्व कार्यक्रमास प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, सरपंच, चेअरमन,बूथ प्रमुख, महिला आघाडी सह सर्व आघाडी, संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेऊन यशस्वी केले.

# श्रावण महिन्यानिमित्त वेदशाळेतील बटूचे पाद्य पूजन, वेदशाळेस १५ हजाराची देणगी सुपूर्द ,पेशवा महिला प्रतिष्ठानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ जुलै**

पेशवा प्रतिष्ठान संचलित पेशवा महिला प्रतिष्ठान तर्फे श्रावण महिन्यानिमित्त येथील धाकटे देवघरातील नृसिंह सरस्वती सर्वज्ञ दासोपंत गुरुकुल वेद पाठशाळेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या शनिवारी पाद्य पूजन करण्यात आले.सुरुवातीला सर्व बटू यांचे पाद्यपूजन करण्यात आले. त्यानंतर बटू ना भोजन, दक्षिणा व त्यानंतर सर्वांना महाप्रसादाचे आयोजन असा यथासांग सोहळा उत्तम पद्धतीत पार पडला.



उपक्रमाची माहिती देताना मनिषा कुलकर्णी म्हणाल्या की , श्रावण महिन्यात विविध सणवार येतात. त्यात शनिवारी मुंजे यांचे पाद्य पूजन, भोजन याला विशेष महत्त्व आहे. घरी एकट्या महिलेने मुंजे यांचे पाद्य पूजन व भोजन करण्यापेक्षा हिंदुत्वाचे कार्य पुढे घेवून जाणाऱ्या वेदशाळेला सर्व महिलांनी एकत्र येवून मदत करावी या उद्देशाने सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पूर्ण श्रावण महिन्यातील किराणासाठी वेदशाळेस देणगी म्हणून रोख रक्कम १५ हजार रू नवनाथ गुरुजी जोशी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

सुयोग्य कार्यकमाचे आयोजन हे पेशवा प्रतिष्ठान चे वैशिष्ट आहे.त्यातलाच हा एक उत्तम असा सोहळा पार पडल्याचे मत घनपाटी नवनाथ गुरुजी जोशी यांनी व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वितेसाठी अनिता औटी,मनीषा कुलकर्णी, राजश्री पिंपळे,ममता दीक्षित, स्मिता भातलवंडे,शुभांगी खारकर,गायत्री राडीकर,रोहिणी जड,प्रणिता पोखरीकर, अपर्णा भालेराव,राजश्री देशमुख,शुभांगी पत्की,भक्ती अकोलकर , डॉ प्रिया मुळे, प्राजक्ता कुलकर्णी, श्रेया जोशी,अनघा लहुरीकर, मधुरा अंबेकर, ऋतुजा कोंडपल्ली, सुवर्णा देवगावकर यांनी सहभाग नोंदविला.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सरस्वती विद्यालयात गणशवेश आणि शालेय साहित्याचे वाटप

### सरस्वती विद्यालयाची भव्य दिव्य इमारत उभारण्यासाठी ना. पंकजाताई यांच्याकडे पाठपुरावा करणार-प्रा.पवन मुंडे



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ जुलै**

ज्या शाळेत ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षण झाले आहे त्या सरस्वती विद्यालयाची इमारत भव्य दिव्य करण्यासाठी आपण पंकजाताई यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी सांगितले. यावेळी वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत यांची प्रमुख उपस्थिती होती.

पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी माझा वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा करावा, बॅनर-पोस्टरबाजी करू नये असे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी ज्या शाळेत ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षण झाले त्या शाळेत गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नीळकंठ चाटे, वैद्यनाथ बँकेचे संचालक महेश निर्मळे, अनिल तांदळे, सारांश अर्बन बँकेचे अध्यक्ष नरसिंग सिरसाट, दै. महाराष्ट्र प्रतिमाचे संपादक ज्ञानोबा सुरवसे, युवक नेते किशोर केंद्रे, प्रशांत कराड, सचिन गिते, नितीन समशेट्टी, प्रितेश तोतला, आदी उपस्थित होते.

प्रारंभी श्री सरस्वती विद्यालय प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमित्रा भुतडा, माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक तांबडे एस.व्ही, ज्येष्ठ शिक्षक सुधीर मिसाळ, रवी गुळभिले, सुधाकर काळे, राठोड बी. डी, पुंडकरे व्ही. टी., केंद्रे एन. एम, सौ.बनसोडे ए.के, प्रवीण केंद्रे, गजानन कोल्हे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी बोलताना प्रा. पवन मुंडे म्हणाले की, सरस्वती शाळा ही नामांकित असून या शाळेने ना. पंकजाताई मुंडे सारखे नेतृत्व महाराष्ट्राला आणि देशाला दिले आहे. त्यामुळे या शाळेचे वैभव वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असून येत्या काही काळामध्ये बीड जिल्ह्यात नाही अशी इमारत सरस्वती शाळेची करण्यासाठी आपण नंबर पंकजाताई मुंडे यांच्याकडे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून उत्सव साजरा केला. अतिशय आकर्षकरित्या सजवलेला केक हॅप्पी बर्थ डे... पंकजाताई साहेब... अशा घोषणा देत चिमुरड्यांच्या हाताने कापला. या घोषणांनी ना. पंकजाताई मुंडे यांची शाळा दणाणून गेली होती.

# प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी रोटरी भूषण पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ जुलै**

येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांना रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने दिला जाणारा रोटरी भूषण पुरस्कार शुक्रवारी सायंकाळी एका भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफल, सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

या पुरस्कार समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे भावी प्रांतपाल जयेश पटेल, उपप्रांतपाल प्रविण देशपांडे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, माजी अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, सौ.शोभा खडकभावी, पारूल पटेल, शर्मिला देशपांडे यांची उपस्थित होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांचा यथोचित सन्मान करून त्यांना रोटरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलता जयेश पटेल म्हणाले की, प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी हे अंबाजोगाई शहरात गेल्या ४० वर्षापासुन शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उभारतीत त्यांचा मोठा वाटा आहे. सामान्य कुटूंबातील अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी अभियंता म्हणून घडविले. आज देश व विदेश पातळीवर त्यांचे विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून रोटरीने त्यंना हा पुरस्कार प्रदान केला आहे. अशा ऋषितुल्य व्यक्तिमत्वाला व त्यांच्या कार्याला उजाळा देवून खडकभावी यांचे दिशादर्शक काम समाजासमोर आणले आहे.

यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी म्हणाले की, समाजातील शेवटच्या माणसांपर्यंत शिक्षण पोहोंचले पाहिजे. या दृष्टीकोणातूनच मी हे कार्य सुरू केले. मात्र आजही बीड जिल्ह्यात ऊसतोड कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. अशा स्थितीत या मुलांच्या शिक्षणासाठी काय करता येईल. यासाठी सामुहिक प्रयत्न झाले पाहिजेत. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गेल्या चाळीस वर्षात अंबाजोगाईकरांनी मला जे प्रेम दिले ते कधीही विसरता येणार नाही. असे सांगुन अंबाजोगाईकरांच्या पाठबळावरच माझी वाटचाल सुरू असल्याचे खडकभावी यांनी सांगितले.